रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १९१ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ९ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

## राज्यात पुन्हा थंडीचा महिमा

**पुणे :** गेल्या काही दिवसांमध्ये 'फेंजल' चक्रीवादळाने डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यातील महाराष्ट्रातील थंडी चांगलीच वाढवली होती. पण, वादळ जमिनीवर आल्यानंतर थंडी गायब झाली. पण आता पुन्हा उत्तर भारतात, मार्गस्थ होत असलेले पश्चिमी वारे व समुद्र सपाटीपासून साडेबारा किमी उंचीवर वाहणारे उच्च वेगवान पश्चिमी वाऱ्यांच्या झोतामुळे थंडीत वाढ होईल. रविवारपासून संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा पुढील १० दिवस म्हणजे बुधवार, दि. १८ डिसेंबरपर्यंत थंडी टिकून राहण्याची शक्यता आहे, असा अंदाज अंदाज सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला.

## विधानसभा अध्यक्षपदी पुन्हा नार्वेकर?

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षपदासाठी माजी अध्यक्ष भाजपचे आमदार राहुल नार्वेकर यांनी रविवारी (८ डिसेंबर) अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील आदी नेते उपस्थित होते. मात्र, विधानसभा अध्यक्षांसाठी राहुल नार्वेकर यांचा एकमेव अर्ज आला आहे. त्यांची बिनविरोध निवड होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. महाविकास आघाडीतर्फे कोणीही अर्ज भरला नाही. त्यामुळे राहुल नार्वेकर हे बिनविरोध निवडून येणार आहेत. याबाबतची अधिकृत घोषणा हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर सोमवारी विधानसभेत करण्याची शक्यता आहे.

# तोडगा निघेना, बळीराजा हटेना!

### मोदी सरकारचा तीव्र निषेध
### शंभू सीमेवर शेतकऱ्यांना धक्काबुक्की



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पंजाब, हरियाण आणि उत्तर भारतातील शेतकऱ्यांनी केंद्र सरकारविरोधात पुन्हा एकदा एल्गार पुकारला आहे. मोदी सरकारच्या धोरणांविरोधात शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. गेल्या १० महिन्यांपासून शेतकरी सरकारच्या धोरणातील बदलाची प्रतीक्षा करत होते. मात्र, अद्याप या वादावर शेतकऱ्यांना तोडगा काढण्यात मोदी सरकारला यश आलेले नाही. त्यामुळे विविध मागण्यांसाठी दिल्लीच्या शंभू सीमेवर आंदोलनाला बसलेल्या शेतकऱ्यांनी रविवारी (दि.८) दिल्लीत कूच करण्यासाठी 'दिल्ली चलो' मार्चचे आयोजन केले होते. पण, हरियाणा पोलिसांनी शेतकऱ्यांना सीमेवरच रोखले. यावेळी आंदोलक शेतकरी व पोलिसांच्यात बाचाबाची झाली. दरम्यान, पोलिसांनी आंदोलकांवर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. यामध्ये अनेक शेतकरी जखमी झाले आहेत.

### दिखाव्यासाठी चर्चा

सरकार आणि शेतकरी संघटनांमध्ये अनेक दिवसांपासून चर्चा सुरू आहे. विकासासाठी शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे. तर आतापर्यंतची चर्चा केवळ दिखाव्यासाठीच राहिल्याचे शेतकरी नेत्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, शंभू सीमेसह इतर सीमा खुल्या करण्यासाठी शेतकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून, याचिका दाखल केली आहे.

> एमएसपीला कायद्याचा दर्जा मिळावा, जेणेकरून शेतकऱ्यांच्या पिकांची रास्त किंमत निश्चित केली जावी, अशी शेतकऱ्यांची इच्छा आहे. वाढत्या कर्जामुळे आणि विजेच्या दरांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे जोपर्यंत सरकार शेतकऱ्यांच्या मागण्या गांभीर्याने घेत नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे.
> – सर्वन सिंग पंढेर, शेतकरी नेते

सकाळी मार्च सुरु होण्याआधी पोलिसांनी आंदोलकांची ओळखपत्रे तपासण्यास सुरुवात केली. दिल्लीकडे जाण्याची मागणी शेतकरी करत होते पण पोलिसांनी त्यांना सीमेवरच रोखून धरले. आंदोलक व पोलिस यांच्यात बाचाबाची सुरु झाली. काही शेतकरी बॅरीकेट तोडण्याचा प्रयत्न करू लागले पण पोलिसांनी अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडून शेतकऱ्यांना पांगवले. यामध्ये रेशम सिंग नामक शेतकरी जखमी झाला. यानंतर आंदोलक संतप्त झाले ते पुन्हा दिल्लीकडे कूच करु लागले. पुन्हा अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. यामध्ये तीन शेतकरी जखमी झाले. त्यानंतर शेतकऱ्यांना शांत करण्यासाठी पोलिसांनी शेतकऱ्यांवर फुले टाकण्यास सुरुवात केली. यानंतर शेतकरी नेते सरवण पान २ वर

# बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे

### जनमताची आयोग, न्यायालयाने दखल घ्यावी : नाना पटोले

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील नव्या सरकारबद्दल जनतेच्या मनात संभ्रम असून, हे सरकार आपल्या मताचे नाही, ही जनभावना राज्यात तीव्र बनली आहे. मारकडवाडीतच नाही तर राज्यातील प्रत्येक गावाची हीच भावना आहे. बॅलेट पेपरवरच मतदान घ्यावे, अशी मागणी जनतेतूनच जोर धरत असून, ग्रामसभा तसे ठराव पास करत आहेत. निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालय या दोन संस्थांनी या जनभावनेची दखल घ्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



विधिमंडळ परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, माझे मत मी दिलेल्या उमेदवारालाच जाते का, यावर जर मतदारांना शंका असेल, तर त्याचे समाधान झाले पाहिजे. मारकडवाडीतील पान २ वर

### सरकारने विधिमंडळाची परंपरा पाळावी

विधानसभा अध्यक्षपद बिनविरोध करणे तसेच उपाध्यक्षपद विरोधी पक्षाला देणे ही महाराष्ट्राच्या विधिमंडळाची परंपरा आहे. दिल्ली विधानसभेत भाजपाचे फक्त तीन सदस्य असतानाही आम आदमी पक्षाने भाजपाला विरोधी पक्षनेतेपद दिले. मविआच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेते पद देण्यासंदर्भात चर्चा केली. सरकार त्यावर सकारात्मक विचार करेल अशी अपेक्षा आहे, असे नाना पटोले म्हणाले.

## वे|ध|क

### 'शिंदेंना गृहखाते देणार नाही'

**मुंबई :** महायुतीचे सरकार स्थापन झाल्यावर खातेवाटपावर तीनही पक्षाच्या नेत्यांत काथ्याकूट सुरू आहे. शिंदे गटाचे नेते एकनाथ शिंदे गृह, महसूल, नगरविकास यासारख्या खात्यांसाठी अडून बसले आहेत. त्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे गटाला गृहमंत्रीपद देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत फडणवीस यांनी गृहमंत्रीपदाबाबतची भूमिका स्पष्ट केली. गृहमंत्रीपद सांभाळत असताना केंद्र सरकारशी, केंद्रीय गृह मंत्रालयाशी समन्वय ठेवावा लागतो. माझा केंद्रीय नेतृत्वाशी जास्तीत जास्त संबंध येतो. त्यामुळे गृह मंत्रालय भाजपकडेच असायला हवे, अशी भूमिका मांडत शिंदेंकडे गृहखाते देण्यास त्यांनी नकार दिला.

### आठ आमदारांचा शपथविधी बाकी

**मुंबई :** विशेष अधिवेशनाच्या कार्यक्रम पत्रिकेत दोन दिवस नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीसाठी ठेवले होते. तर तिसऱ्या दिवशी राज्यपालांचे अभिभाषण आणि विधानसभा अध्यक्षांची निवड असा कार्यक्रम जाहीर केला होता. २८७ पैकी पहिल्या दिवशी १७३, तर दुसऱ्या दिवशी १०६ आमदारांनी शपथ घेतली. दरम्यान, उत्तमराव जानकर, विलास भुमरे, वरुण सरदेसाई, मनोज जामसुतकर, विनय कोरे, जयंत पाटील, शेखर निकम, सुनील शेळके हे सदस्य अनुपस्थित राहिले. त्यापैकी जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असल्याने उपस्थित राहणार नाही, असे पत्र विधिमंडळाला दिले होते. हे आमदार आता सोमवारी शपथ घेतील, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

### आ. पाडवींची उडाली भंबेरी

**मुंबई :** शिंदे गटाचे आमदार आमश्या पाडवी यांना शपथविधीदरम्यान एकही शब्द नीट वाचता आला नाही. त्यांची शपथ घेताना अक्षरशः भंबेरी उडाल्याचे दिसून आले. अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघातून आमश्या पाडवी यांनी हिना गावित यांना पराभूत केलं. रविवारी आमश्या पाडवी यांनी विधानसभेत आमदारकीची शपथ घेतली. परंतु, त्यांची ही शपथही आज चर्चेचा विषय ठरली. त्यांना दोन ओळींचा शपथग्रहणाचा मसुदाही नीट वाचता आला नाही. केवळ दोन ओळींची शपथ घेण्यासाठीही त्यांना मदतीची गरज लागली. या शपथेतही त्यांनी अनेक चुका केल्या. त्यामुळे त्यांचा हा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे.

# पुनर्वसन संकुलांची जीर्णावस्था

### उपजिल्हाधिकाऱ्यांकडून ७७ लाखांचा प्रस्ताव

। पोलादपूर । शैलेश पालकर ।



तालुक्यातील कोंढवी आणि कोतवाल येथे सिध्दीविनायक ट्रस्टच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या पुनर्वसन संकुलाचा ताबा दरडग्रस्तांना लॉटरीद्वारे देण्यात आला आहे. सिध्दीविनायक ट्रस्टच्या मदतीचा योग्य विनियोग न झाल्याने पोलादपूर तालुका पुनर्वसनास वंचित राहिला आहे. मात्र, सध्या या जीर्णावस्थेत असलेल्या दोन्ही पुनर्वसन संकुलांच्या इमारत सरकार आणि आपद्ग्रस्तांच्या कोत्या मानसिकतेचे द्योतक म्हणून उभ्या आहेत.

२५ व २६ जुलै २००५ रोजी या दोन्ही गावांमध्ये भूस्खलनामुळे दरडग्रस्त झालेल्यांसाठीच्या पुनर्वसन संकुलात न राहता दरडप्रवण क्षेत्रातच अद्याप दरडग्रस्त राहात आहेत. पोलादपूरमध्ये काही काळ तहसीलदार राहिलेल्या पुनर्वसन उपजिल्हाधिकारी महोदया या दरडग्रस्त गावांना भेट देऊन पाहणी करून गेल्यानंतर ७६.९५ लाख रूपयांचा प्रस्ताव सादर केल्याची माहिती प्राप्त झाली. मात्र, त्यानंतरही पुनर्वसन संकुलांचे पुनर्वसन कधी होणार याकडे कोंढवी आणि कोतवालच्या दरडग्रस्तांचे लक्ष लागले आहे.

२५ व २६ जुलै २००५ च्या अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खलनानंतर पान २ वर

# जाहिरात फलक उभारताना अपघात

- क्रेनची केबल तुटल्याने लोखंडी पिलर कोसळला
- कामगारांचे प्राण थोडक्यात वाचले

। अलिबाग । वार्ताहर ।



मानसरोवर स्थानकाबाहेर जाहिरात फलक उभारताना अपघात घडल्याची घटना शनिवारी (दि. ७) घडली आहे. रात्री आठ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेनुसार जाहिरात फलक उभारण्यासाठी क्रेनच्या सहाय्याने उचलण्यात आलेला पिलर क्रेनची केबल तुटून कोसळल्याने फालकाचे काम करणारे पाच ते सहा कामगार थोडक्यात बचावले आहेत. परंतु, शेजारीच असलेल्या उसाच्या रसाच्या गाड्यांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र, या घटनेची दुसऱ्या दिवसापर्यंत पालिकेच्या आयुक्तांना खबरच नव्हती, याबाबत आश्चर्य वाटते.

जाहिरात फलक कोसळून जीवितहानी झाल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडल्या आहेत. काही दिवसांपूर्वी पालिका पान २ वर

### पालिकेला जाग कधी येणार ?

पालिकेच्या स्थापनेनंतर पालिका हद्दीत तीन वेळा फलक कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, या घटनांनंतर पालिकेच्या माध्यमातून कोणतीही कारवाई संबंधित कंपनीविरोधात करण्यात आली नाही. यामुळे जीवितहानी झाल्यावरच पालिकेला जाग येणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### मोठी दुर्घटना टळली

ज्यावेळी ही दुर्घटना घडली, त्यावेळी अनेक रेल्वे प्रवासी लगबगीने घराकडे निघाले होते, तसेच शनिवार असल्याने अनेक हनुमान भक्त ज्या ठिकाणी फलक उभारण्यात येत होता, त्या ठिकाणी असलेल्या मंदिरात दर्शनासाठी उभे होते. क्रेनने उचलण्यात आलेला पिलर गर्दीपासून काहीशा अंतरावर कोसळल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.

> पालिकेने अधिकृतरित्या नेमण्यात आलेल्या रौनत एजन्सीकडून फलक उभारण्याची परवानगी घेण्यात आली होती. त्यानुसार काम सुरू असताना हा अपघात झाला आहे. यामध्ये कोणतीही जीवित वा वित्तहानी झालेली नाही. या घटनेनंतर पुन्हा फलकाचे काम व्यवस्थितरित्या पूर्ण करण्यात आले आहे.
> – मंगेश चितळे, पालिका आयुक्त

# ताम्हिणी घाटात प्रवासी बस पलटली

। माणगाव । प्रतिनिधी ।



- १७ प्रवासी जखमी
- माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु

पुणे ते माणगावदरम्यान ताम्हिणी घाटात मध्यरात्री खासगी प्रवासी बसला अपघात होऊन या अपघातात बसमधील १७ प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, दि. ८ डिसेंबर रोजी मध्यरात्री पुण्याहून चिपळूणकडे निघालेल्या बस क्र. एमएच १२ व्हीएफ ९०५२ वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ताम्हिणी घाटात पान २ वर

### जखमींची नावे

स्वस्ति गायकवाड, साची गायकवाड, स्वामिनी गायकवाड, यश यादव, दक्ष गायकवाड, विक्रम गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, भावना यादव, आदेश गायकवाड, उर्मिला गायकवाड, रजनी गायकवाड, गणेश गुंजाळ, स्मिता झोंबरे, प्रवीण झोंबरे, सुजल झोंबरे, समिक्षा झोंबरे, मेघा जाधव.

# चालत्या एसटीचे चाक निखळले

। कोर्लई । वार्ताहर ।



- चालकाच्या प्रसंगावधानामुळे प्रवासी बचावले
- मुरुड आगाराचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

अलिबागहून मुरुडकडे प्रवाशांनी खचाखच भरलेल्या चालत्या एसटी बसचे चाक निखळले, परंतु चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला आहे. कारण, त्या एसटी बसमध्ये जवळपास ७० प्रवासी प्रवास करीत होते. त्यामुळे प्रवाशांच्या जिवाशी खेळणाऱ्या मुरुड आगाराचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून, प्रवाशांकडून संताप व्यक्त होत आहे.

मुरुडहून बोरीवलीकडे जाणाऱ्या एसटी बसचा बिघाड चालकाच्या लक्षात आल्याने अलिबाग येथून परत मुरुडला येत असताना मध्येच खारगल्ली येथे आल्यावर आवाज येत असल्याचे लक्षात येताच चालक संदीप डावखरे यांनी खाली उतरून पाहिले. त्यावेळी चालकास एसटीचे मागील बाजूचे चाक निखळले असल्याचे दिसून आले. चालकाने वेळीच प्रसंगावधान राखून गाडी थांबवली. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. सदर एसटीमध्ये सत्तर प्रवासी होते. दरम्यान प्रवाशांनी चालकाचे मनोमन आभार मानले. परंतु, या घटनेने मुरुड आगाराचा भोंगळ कारभार समोर आला आहे.

मुरुड आगारातून सकाळी ११-३० वाजता पान २ वर

# भरधाव ट्रेलर हॉटेलला धडकला

- चाकाखाली दबून कामगार जागीच ठार
- तीन कारचेही मोठे नुकसान

। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर भरधाव वेगात जाणाऱ्या ट्रेलरने फूड कोर्ट या हॉटेलला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या ट्रेलरखाली दबून एका कामगाराचा दुर्दैवीरित्या मृत्यू झाला. दरम्यान, ट्रेलरने तीन कारना जोरदार धडक दिली.

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरून ट्रेलर पुण्याहून मुंबईकडे जात होता. तो बोरघाटात असताना एक्स्प्रेसवेवरील फूड कोर्ट हॉटेलजवळ आला असता चालकाचे ट्रेलरवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील फूड कोर्ट हॉटेलला जोरदार धडक दिली. दरम्यान, त्याने हॉटेल समोरील तीन कारला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात हॉटेलमधील कामगार इंद्रदेव पासवान (रा. बिहार) याचा ट्रेलरखाली दबल्याने मृत्यू झाला आहे, तर तीन कार कारचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र, सुदैवाने हॉटेलमधील अन्य प्रवासी आणि कामगारांना कोणतीही इजा झाली नसल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.

या अपघाताची माहिती मिळताच आयआरबी पान २ वर

### २५० गावकऱ्यांनी एकत्रित येत केली भातझोडणी

# सामूहिक शेतीचा आदर्श सांगणारी खारआंबोळी

। सुधीर नाझरे ।
। मुरुड जंजिरा ।

**कोकणातील रायगड जिल्हह्यातील मुरुड तालुका हा निसर्गाने भरभरुन सौंदर्य लाभलेला तालुका आहे. तालुक्यातील खारआंबोळी हे जवळपास २५० लोकवस्तीचे गाव आहे. येथील कुटुंबे आजही गुण्यागोविंदाने नांदतात. याचा प्रत्यय नुकताच आला. घरटी एका पुरुषाने एकत्र येत भाताची सामुदायिक झोडणी केली. एकीकडे शेतीसाठी मजुरांची वानवा असताना, दुसरीकडे खारआंबोळी गावाने 'गाव करील ते राव काय करील' या उक्तीतून मजुरांच्या समस्येवर मात करीत झोडणीचे काम पूर्ण केले. गावाचा आदर्श अन्य गावांनी घेतल्यास शेतीचे कामे पूर्णत्वास जाण्यास अडचण येणार नसून, याबाबत गावाचे कौतुक होत आहे.**





रायगडमधील मुरुड तालुक्यात खारआंबोळी गावात २५० गावकऱ्यांनी देवळासमोरील शेतीत जुलै महिन्यात भातलावणी केली होती. आज भाताची सामुदायिक झोडणी करून १०० किलोची ९२ पोती भात समाजासाठी जमा केले, अशी माहिती माजी सरपंच मनोज कमाने यांनी दिली. गावागावातील मतभेद विसरून गावच्या शेतात हाक दिल्याबरोबर पुरुष सकाळी सात वाजल्यापासून कामाला येतात. झोडणी काम लवकर व्हावे म्हणून पारंपरिक पद्धत आजही वापरतात. कोणत्याही मशीनचा वापर करत नाही. गावातील मंडळी कुशल कामगार असल्याने बाहेर दिवसाला एक हजार मजुरी घेणारेदेखील गावच्या झोडणीच्या कामाला स्वतःहून हजर राहतात. आपापसातील मतभेद विसरून आनंदात माणुसकीची मूल्य जपून कामात सहभागी होतात, असेही कमाने यांनी सांगितले. अशी परंपरा कोठे पाहायला मिळत नाही, त्यासाठी हे गाव प्रसिद्ध आहे, असे कमाने म्हणाले.

मजुरीने पान २ वर

> गावातील अनेक मंडळी कुशल कामगार आहेत. परंतु, बाहेर दिवसाला एक हजार रुपये मजुरी घेणारेदेखील गावच्या झोडणीच्या कामाला स्वतःहून हजर राहतात. आपापसातील मतभेद विसरून आनंदात माणुसकीची मूल्यं जपून कामात सहभागी होतात. अशी परंपरा कोठेही पाहायला मिळत नाही, त्यासाठी हे गाव प्रसिद्ध आहे.
> – मनोज कमाने, माजी सरपंच



# निधीअभावी मच्छीमार्केटचे काम रखडले

■ कामासाठी वाढीव निधी मिळणार तरी कधी?



**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरात होत असलेल्या मच्छी मार्केटचे काम हे निधीच्या कमतरतेमुळे गेल्या दोन वर्षांपासून रखडले असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. तळा शहरातील कुरुक्कर हॉस्पिटलसमोर नवीन मच्छी मार्केटची इमारत उभी राहात असून, सुरुवातीस युद्धपातळीवर सुरू असलेल्या कामाची निधीअभावी हळूहळू गती मंदावली. आणि आता गेल्या दोन वर्षांपासून हे मच्छी मार्केटचे काम अर्धवट स्थितीत तशाच अवस्थेत आहे.

या मच्छी मार्केटच्या इमारतीसाठी अंदाजित रक्कम ९१ लाख ४१ हजार सातशे एवढी असून, नगरोथान योजनेच्या माध्यमातून ५८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मात्र, उर्वरित रक्कम ३३ लाख ४१ हजार सातशे रुपये नगरपंचायतीला अद्याप प्राप्त झाले नसल्याने सदर मच्छी मार्केट इमारतीचे काम निधीअभावी रखडले आहे. तळा बाजारपेठेत बसस्थानकशेजारी असलेल्या जुन्या मच्छी मार्केटमध्ये योग्य सुविधा नसल्याने बहुतांश मच्छी विक्रेते मच्छी विक्रीसाठी बाहेर बसतात. त्यामुळे मच्छी विक्रेत्यांना हक्काची जागा कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच ज्या ठिकाणी हे मच्छी मार्केट होत आहे, त्या ठिकाणी नगरपंचायतीचे १२ भुईभाडे गाळेधारक होते. व नवीन मच्छीमार्केटच्या इमारतीमध्ये पक्के १८ गाळे बांधण्यात येणार आहेत. मात्र, मच्छी मार्केटच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याने या भुईभाडे गाळेधारकांना इतरत्र आपला व्यवसाय करावा लागत आहे. यांसह नगरपंचायतीला या गाळेधारकांकडून मिळणारे उत्पन्नदेखील रखडले आहे. उर्वरित निधी लवकरात लवकर मिळावा यासाठी नगरपंचायत प्रशासनाकडून प्रस्ताव पाठविण्यात आला असून, नागरी सुविधा किंवा वैशिष्ट्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाला की लवकरच मच्छीमार्केट इमारतीच्या कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे पुढील काळात प्रशासन काय पावले उचलणार, याकडे तळावासियांचे लक्ष लागून राहिले आहे.



# मोफत आयुष्यमान कार्डचे वाटप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मोफत आयुष्मान कार्ड, ई-श्रम कार्ड व शालेय विद्यार्थ्यांचे अपार आयडी कार्ड यांचे वाटप करण्यात आले.

भारतरत्न भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथे डिकसळ येथे परिसरातील सर्व लोकांसाठी मोफत आयुष्मान कार्ड, ई-श्रम कार्ड व शालेय विद्यार्थ्यांचे अपार आयडी कार्ड बनवून देण्यात आले. अखिल पोलिस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली व हिंद पोलीस फ्रेंड असोसिएशन या संघटनेच्या तसेच वैशाली सायबर कॅफेच्या माध्यमातून हे शिबीर राबविण्यात आले. यावेळी पोलीस मित्र संघटनेचे युवा अध्यक्ष प्रफुल्ल जाधव यांनी शिबिरादरम्यान लोकांना आयुष्मान कार्ड, ई-श्रम कार्ड यांचे फायदे पटवून सांगितले, तसेच लोकांनी या शिबिरास उत्तम असा प्रतिसाद दिला. ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर ई-श्रम कार्ड वाटपसुद्धा करण्यात आले. यावेळी डिकसळ परिसरातील ५० लोकांनी सहभाग घेतला. अखिल पोलीस सुरक्षा परिषद ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, प्रफुल्ल जाधव, तालुका उपाध्यक्ष संतोष पवार, संतोष थोरवे, दयानंद म्हसे आदी कार्यक्रमाला उपस्थित होते.



# वनराई बंधारे ठरताहेत वरदान

**पशु-पक्ष्यांसह शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न मार्गी**

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

वनराई बंधारा बांधून पाण्याची पातळी वाढून काही दिवस पाणी येथेच अडविले तर काही महिने या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागत असतात. ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. गुरांच्या पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न मार्गी लागत असतो.यामुळे गाव पातळीवर बंधारा बांधून पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविणे काळाची गरज आहे. यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणी पशु-पक्ष्यांसाठी वरदान ठरत आहे.

पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात. मात्र काही ठिकाणी हेच पाणी आपण अडवू शकतो. उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्त्व समजते. कारण विहीर, तलाव, कूपनलिका, ओढे असे पाण्याचे असलेले स्त्रोत्र तळ गाठण्याची स्थिती निर्माण करीत असतात. पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशू,पक्षी, झाडे, मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असतो. यामुळे वनराई बंधाऱ्यांचे महत्त्व जाणून घेऊन पाणी अडविले पाहिजे, असे आवाहन करण्यात येत आहे.

या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी तसेच जंगलातील प्राणी यांना पिण्यासाठी होत आहे. शिवाय, शेतकरी यावरती भाजीपाल्यांचे उत्पन्न घेतले जाते. यामुळे रोजगारांचा प्रश्न मार्गी लागत आहे.

# पोलादपूर शहरात महाबळेश्वरची रसरशीत स्ट्रॉबेरी

■ लालचुटूक फळांनी वेधलेय ग्राहकांचे लक्ष

■ जमिनीखालील महामार्गामुळे विक्री जेमतेम



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हिसरोड तसेच ओव्हरब्रिजवर सध्या महाबळेश्वरची रसरशीत स्ट्रॉबेरी विकण्यासाठी दरवर्षीप्रमाणे काही शेतकरी घेऊन येऊ लागले आहेत. मात्र, जमिनीखालून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग गेल्याने स्ट्रॉबेरीची विक्री जेमतेम असून, लालचूटूक फळांनी मात्र ग्राहकांचे लक्ष वेधण्यास सुरूवात केली आहे.

तालुक्यात पावसाळ्यामध्ये अतिवृष्टी, हिवाळ्यात कडाक्याची थंडी आणि उन्हाळ्यामध्ये प्रचंड उष्णता असे तीनही ऋतू कमालीचे तीव्र स्वरूपात अनुभवावे लागत असतात. यामुळे प्रयोगशील शेतकऱ्यांना शेंगदाणा, हळद, बटाटे, कांदे अशी अपारंपरिक पिके घेण्यास संधी मिळते. मात्र, ही संधी यशस्वी करणारे शेतकरी या पिकांच्या उत्पादनामध्ये सातत्य ठेवत नसल्याचा अनुभव तालुक्यातील कृषी पर्यवेक्षकांना येत आहे. पोलादपूर एस.टी. स्थानकासमोरील ओव्हरब्रिजवरील हातगाड्या तसेच जुन्या पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या परिसरातील महाबळेश्वर वाई सुरूर रस्त्यावर महाबळेश्वर परिसरातील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी स्ट्रॉबेरी टोपल्यांमधून विकण्यासाठी घेऊन बसतात. सध्या प्रतिकिलो १८० ते २०० रूपये दर आहे. पण, स्ट्रॉबेरीचे फळ काहीसे आंबट असल्याने ग्राहकांकडून केवळ हौशीपोटी खरेदी केली जात आहे. शिमग्यापूर्वी या फळाची गोडी अवीट होऊन आवक वाढून दरसुध्दा कमी होतात. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग पोलादपूर येथील सर्व्हिसरोडच्या जमिनीखाली तब्बल ३० ते ३५ फूट खोलवरून गेल्याने स्ट्रॉबेरीसाठी महामार्गावरील ग्राहक उपलब्ध होत नसल्याने स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांना सध्या केवळ बाजारपेठ व मागणी टिकवून ठेवण्यासोबत स्ट्रॉबेरीची फळे नासून जाण्यापूर्वी विकून प्रवासभाडे व चरितार्थ चालविण्यापुरती कमाई करण्यासाठीच धडपड करावी लागत आहे.

# उरण पोस्ट ऑफिस धोकादायक इमारतीत

■ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरातील गिरीराज आनंदनगर येथील गिरीराज सोसायटीमधील भाडे तत्त्वावर असलेले पोस्ट ऑफिस सध्या धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतीत कार्यरत असून, यामुळे नागरिकांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

ही इमारत जुनी असून, तिच्या भिंतींना मोठे तडे गेले आहेत, छताचा काही भाग कोसळण्यास सुरुवात झाली आहे. नगरपालिकेने एक-दीड वर्षांपूर्वी धोकादायक इमारत जाहीर करून तशी नोटीस ही संबंधित सोसायटीला देऊन त्वरित रहिवाशांनी स्थलांतरित होण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार बहुतांश रहिवासी हे स्थलांतरित झाले आहे. मात्र, भाडे तत्त्वावर असलेले पोस्ट ऑफिस आजही सुरू आहे. याबाबत सोसायटीने पोस्ट ऑफिसच्या वाशी व उरण येथील कार्यालयाकडे अनेकवेळा लेखी पत्रव्यहार करून आजच्या घडीला कित्येक महिने उलटूनही गेंड्याच्या कातडीचे पोस्ट विभागाचे अधिकारी याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याचे उघड होते. गिरीराज सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी अनेकवेळा वाशी पोस्ट ऑफिसमधील वरिष्ठ अधिकारी वर्गाची भेट घेऊन विनवणी केली आहे. तरीही अधिकारी वर्ग याकडे दुर्लक्ष करीत असल्याने त्यांना ग्राहकांच्या सुरक्षितेबाबत कोणतेही सोयरसुतक नसल्याचे उघड होते. यामुळे या ठिकाणी येणारे शेकडो नागरिक आणि पोस्ट ऑफिसमधील कर्मचारी यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

सोसायटीने याबाबत नगरपालिका व पोलीस प्रशासन यांना लेखीपत्राद्वारे तक्रार करून प्रशासनाकडे तक्रार दाखल केली असून, पोस्ट ऑफिस सुरक्षित जागेत हलविण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

भविष्यात दुर्घटना घडू नये यादृष्टीने पोस्ट ऑफिस तात्काळ सुरक्षित इमारतीत हलवावे. तसेच धोकादायक इमारतीची तपासणी करून तिचे पुनरुज्जीवन करावे किंवा ती पाडावी. प्रशासनाने पोस्ट ऑफिस चालवण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सोसायटीच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा होणाऱ्या दुर्घटनेस सोसायटी जबाबदार राहणार नसल्याचे सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# मयत पोलीस पाटलांच्या कुटुंबियांना मदत

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता खालापूर पोलीस ठाण्यात पोलीस पाटील यांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये निवृत्त पोलीस पाटील सत्कार, आदर्श पोलीस पाटील तसेच मयत पोलीस पाटील यांचे कुटुंबाला निधी वाटप करण्यात आली.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस निरीक्षक शितल राऊत, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव आदी प्रमुखासह मोठ्या संख्येने पोलीस पाटील बंधू-भगिनी उपस्थित होते.

तर लोहोप गावचे मयत पोलीस पाटील कै. मोहन पाटील यांचे कुटुंबियांना उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय खालापूर विभाग, खालापूर तालुका पोलीस पाटील, खालापूर- रसायनी-खोपोली पोलीस ठाण्याकडून एकत्रिक रक्कम रूपये १,४९,५०० रूपयांची आर्थिक मदत उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या हस्ते कै.मोहन पाटील यांच्या पत्नी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. तसेच प्रदीर्घ सेवा देऊन निवृत्त झालेले उसरोली गावचे पोलीस पाटील खंडु पाटील, तोंडली पोलीस पाटील अनंत मलबारी, इसांबे पोलीस पाटील अनंत देवघरे, आसरोटी पोलीस पाटील हरिभाऊ पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा बदली झालेले अंमलदार पोलीस शिपाई अभिमन्यू आहेरकर यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले. तर वर्षामध्ये चांगले प्रकारे काम केलेले सावरोली गावचे पोलीस पाटील प्रमोद किळंजे यांना यावर्षीचा आदर्श पोलीस पाटील म्हणून सत्कार करून गौरविण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सर्व उपस्थित पोलीस पाटलांना मार्गदर्शन करत सूचना दिल्या.

पान १ वरून

## तोडगा निघेना, बळीराजा हटेना!

सिंह पधेर हे त्याठिकाणी आले. त्यांनी शेतकऱ्यांना परत फिरण्याच्या सूचना केल्या. दरम्यान, शेतकरी फेब्रुवारी २०२४ पासून दिल्ली हरीयाणामधील शंभू सीमेवर आंदोलनाला बसले आहेत. गेले ३०० दिवस हे आंदोलन सुरु आहे. शेतमाला किमान आधारभूत किंमत मिळावी व कर्जमाफी या प्रमुख मागण्यासांठी शेतकऱ्यांचे हे आंदोलन सुरु आहे.

**गाव बचावो... अभियान**

राजधानी दिल्लीत शेतकरी सरकारविरोधात निदर्शनं करत आहेत. दिल्लीत 'गाव बचाओ देश बचाओ' अभियान राबवून शेतकरी आंदोलन करत आहेत. रविवारी शेतकऱ्यांनी दिल्लीच्या वेस्ट एन्क्लेव्ह मेट्रो स्टेशनचं नाव बदललं. शेतकऱ्यांनी वेस्ट एन्क्लेव्ह मेट्रो स्टेशनचं नाव काळ्या शाईनं पुसून तिथं मंगोलपूर कला मेट्रो स्टेशन लिहिलं आहे. या अभियानाद्वारे आतापर्यंत दिल्लीतील ३०० हून अधिक गावांना भेटी दिल्या आहेत. पालम ३६० खापचे प्रमुख चौधरी सुरेंद्र सोळंकी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी आंदोलन केले. याचबरोबर, २२ डिसेंबरला दिल्लीतील खेड्यापाड्यातील शेतकरी एकत्र येऊन महापंचायत घेणार असून, त्यामध्ये आंदोलनाची पुढील रणनीती ठरणार आहे.

## बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे

लोकांनी बॅलेट पेपरवरील मतदानासाठी मॉक पोलिंग घेण्याचा निर्धार केला होता. पण, निवडणूक आयोग, पोलीस प्रशासनाच्या मदतीने सरकारने त्यांची मुस्कटदाबी केली, त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. ७६ लाख मते कशी वाढली, याचे उत्तर निवडणूक आयोगाला द्यावे लागेल. पण, ते समाधानकारक उत्तर देत नाहीत. मतांची चोरी करणे, हा लोकशाहीचा दिवसाढवळ्या केलेला खून आहे. लोकशाहीमध्ये अशा प्रकारे असंतोष निर्माण झाला असेल तर त्याची दखल घ्यावीच लागले. विरोधी पक्ष या नात्याने आम्ही सभागृहात व रस्त्यावर जनतेच्या या मागणीसाठी लढू, असे पटोले म्हणाले.

## जाहिरात फलक उभारताना अपघात

हद्दीतदेखील जाहिरात फलक कोसळून एका वाहनाचे किरकोळ नुकसान झाल्याची घटना घडली आहे. घाटकोपर येथे काही महिन्यांपूर्वी फलक कोसळून घडलेल्या दुर्घटनेत नऊ जणांनी आपले प्राण गमवाल्यानंतर प्रशासनाकडून फलक उभारण्याबद्दल कठोर नियम करण्यात आले आहेत. असे असतानादेखील पनवेल पालिकेच्या माध्यमातून जाहिरात फलक उभारण्यासाठी नेमण्यात आलेल्या कंपनीकडून नियमांना बगल देऊन जागा मिळेल तिथे फलक उभारले जात आहेत. महत्त्वाचे म्हणजे, अगदी काही तासात उभारण्यात येत असलेल्या फलकावर दुसऱ्याच दिवशी जाहिराती झळकत असल्याने संबंधित कंपनी कोणत्या स्वरूपाचे स्ट्रक्चरल ऑडिट सादर करते, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

खारघर वसाहतीत जुलै महिन्यात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर पालिकेने फलक उभारणाऱ्या कंपनीविरोधात कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, असं न करता फलक सुरक्षित असल्याचा रिपोर्ट देणारे ऑडिटर दुर्घटनेला जबाबदार असल्याचा दावा करत पालिकेकडून फलक उभारणाऱ्या कंपनीला क्लीनचिट देण्यात आली होती. याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे.

## पुनर्वसन संकुलांची जीर्णावस्था

तालुक्यातील कोतवाल बुद्रुकमध्ये ६, कोतवाल खुर्दमध्ये ३ आणि लोहारमाळ-पवारवाडीमध्ये २ जणांचा जमिनीत गाडले गेल्याने मृत्यू झाला. याखेरीज, पोलादपूर तालुक्यातील कोंढवी येथेही मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाल्याने कोतवालसह कोंढवीमधील दरडग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे आव्हान निर्माण झाले. पुनर्वसनाच्या पहिल्या टप्प्यात पोलादपूर तालुक्यातील बोरावळे येथील ९ घरांच्या बांधकामानंतर तेथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाले. सावित्री महिला विकास संस्थेतर्फे पैठण गावात ३, देवपूर येथे ४, पार्ले येथे ३, माटवण येथे ५, पोलादपूर- जोगेश्वरी गाडीतळ येथे ३, सडवली येथे ६, लोहारमाळ येथे ४, रानबाजिरे येथे २३, आड येथे २, सवाद येथे १ आणि हावरे येथे ६ अशी एकूण ६१ घरकुले बांधण्यात येऊन ताबाही देण्यात आला. पोलादपूर येथील चित्रे यांना घरबांधणीसाठी सरकारी अनुदान देण्यात आले.

याखेरीज, कोतवाल खुर्द आणि बुद्रुकच्या दरडग्रस्तांसाठी २८ घरकुलं उभी राहतील एवढे क्षेत्र तर कोंढवी येथे २९ घरकुलं उभी राहतील एवढे क्षेत्र उपलब्ध करण्यात येऊन पुनर्वसनाचे प्रयत्न सरकारकडून सुरू झाले. सिध्दीविनायक ट्रस्ट, मुंबईने याकामी खर्चाची जबाबदारी उचलली. कोतवालमध्ये दरडग्रस्तांची संख्या ४८ तर कोंढवी येथे ७८ कुटुंबे अशी असताना दोन्ही ठिकाणी प्रत्येकी ४५ लाख रूपये खर्चातून केवळ १५-१५ घरकुलं उभारण्यात आली. गेल्या तीन-चार वर्षांत कोतवाल येथे घरकुलांपर्यंत जाणाऱ्या रस्त्यासाठी भूसंपादन करण्याकामी तत्कालीन तहसीलदारांनी केलेली कुचराई तत्कालीन रायगड जिल्हाधिकारी सुभाष सोनावणे यांनी सिध्दीविनायक ट्रस्टचे विश्वस्त सुभाष मयेकर यांच्या हस्ते ५० लाखांचा धनादेश प्रदान करतेवेळी नाराजीसह उघड केली. मात्र, त्यानंतर कोंढवी आणि कोतवाल येथील घरकुलांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होण्याऐवजी ती दिवसेंदिवस खालावत गेली. दुसऱ्या टप्प्यात मिळालेली रक्कम झालेल्या कामापोटीच मिळाली, असे सांगून ठेकेदार त्याठिकाणी फिरकेनासेही झाले. कोंढवी येथे बांधण्यात आलेल्या सिध्दीविनायक ट्रस्टतर्फे बांधण्यात आलेल्या पुनर्वसन घरकुलांचा १५ दरडग्रस्तांना लॉटरी पध्दतीने ताबा देण्यात आला. यापैकी ५ जणांनी घरकुलांचा ताबा घेतल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. यापैकी ४ जणांनी गृहप्रवेश केला. एकच दरडग्रस्त काहीकाळ वास्तव्यास होता, तर अन्य लोक दरडप्रवण क्षेत्रातून येथे स्थलांतरीत झाले नाहीत.

कोंढवी येथे पुनर्वसन घरकुलाची किंमत ४९ लाख ४९ हजार ६५१ रूपये एवढी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कोंढवी आणि कोतवाल या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी २१ घरकुलांची प्रशासकीय मान्यतेनुसार मंजुरी असताना केवळ प्रत्येकी १५ घरकुले बांधण्यात आली आहेत. यातही कोंढवीतील घरकुले बांधण्यात आलेल्या जागेचा वाद उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने नजीकच्या काळात तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. उर्वरित पात्र दरडग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी ७५ लाखांचा प्रस्ताव मदत आणि पुनर्वसन विभागाकडे पाठविण्यात आल्याने आता पुनर्वसन कामात राजकीय हस्तक्षेप आणि विलंब प्रशासनाकडून टाळला जाण्याची ग्वाही दोन वर्षांपूर्वी प्रशासनाकडून देण्यात येऊनही अद्याप कार्यवाही नाही. अलीकडेच रायगडच्या पुनर्वसन उपजिल्हाधिकारी महोदया यांनी कोतवाल आणि कोंढवी येथील पुनर्वसनासंदर्भात १० फेब्रुवारी २०१९ रोजी भेट दिली असता त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार कोंढवी येथे २६ लक्ष ९९ हजार १९८ रूपये तर कोतवाल येथे ४९ लक्ष ९५ हजार ८९६ असे एकूण ७६ लक्ष ९५ हजार ०९४ रूपये पुनर्वसन कामी प्रस्तावित केले आहेत. कोतवालचे भूमीपुत्र आमदार प्रवीण दरेकर यांनी याप्रश्नी विशेष लक्ष दिल्यास राज्य सरकारकडून या रकमेला मंजूरीही मिळून पुनर्वसन कामास गती प्राप्त होईल, अशी अपेक्षा आहे.

कोतवाल येथील दरडग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न सुरूवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यामध्ये राहिला. सर्वच घरकुलांचे काम पूर्ण होऊनही हस्तांतरीत न झाल्याने घरकुलांची कौले, खिडक्या, भिंती यांचे खूपच नुकसान झाल्याने कोंढवीप्रमाणे कोतवालच्या घरकुलांचादेखील जीर्णोद्धार करण्याची गरज निर्माण झाली आहे. २००५ च्या अतिवृष्टीनंतर राज्य सरकारने केलेल्या आपत्तीनिवारण कायद्यानुसार पुनर्वसनकामी हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूद्ध कार्यवाही करण्याची भूमिका नमूद करण्यात आली आहे. या कायद्याचा अंमल अधिकाऱ्यांनीच करायचा असल्याने नोकरशाहीकडून नोकरशहांना अभय मिळाल्याचेच सकृतदर्शनी दिसून येत आहे.

## भरधाव ट्रेलर हॉटेलला धडकला

पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटलची टीम, बोरघाट पोलीस, अपघातग्रस्त टीमचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ट्रेलरमध्ये अडकेल्या आणि त्याखाली बदलेल्या व्यक्तीला बाहेर काढून मदत केली. त्यानंतर अपघातग्रस्त ट्रेलर बाजूला काढून एक्स्प्रेसवे वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला.

## चालत्या एसटीचे चाक निखळले

सुटलेल्या मुरुड-बोरीवली एसटीतून काही तरी आवाज येत होता म्हणून चालकाने बस अलिबाग आगारात थांबवली. त्याठिकाणी आलेल्या कल्याण-मुरुड गाडीत प्रवासी बसवून बोरिवलीकडे जाण्यासाठी रवाना करण्यात आली, तर कल्याणकडून मुरुडकडे जाणारे गाडीतील प्रवासी घेऊन परतत असताना खारगल्लीनजीक गाडीत जास्त आवाज येत असल्याचे लक्षात येताच चालक संदीप डावखरे यांनी ताबडतोब गाडी थांबवली आणि प्रवाशांना खाली उतरविले. गाडीची पाहाणी करण्यासाठी गेले असता मागील बाजूचे चाक निखळले असल्याचे दिसून आले. चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे पुढील अनर्थ व जीवितहानी टळली, त्यामुळे सर्व प्रवाशांनी चालकाचे आभार मानले.

गेल्या अनेक महिन्यांपासून मुरुड आगारातील भंगार गाड्या अनेक वेळा ब्रेक डाऊन होऊन बंद पडण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. याची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी प्रवासी व नागरिकांतून केली जात आहे.

## सामूहिक शेतीचा आदर्श सांगणारी खारआंबोळी

माणसे घेऊन शेतीची कामे जोरकसपणे सुरू आहेत. पावसाचा अनियमितपणा असला तरी आता पावसामुळे शेतजमिनीत ओसाड होऊ देत नाही. पावसाची अजूनही गरज असून, त्यावरच भातशेतीची मदार आहे. तालुक्यात तीन हजार हेक्टर जमिनीवर भातशेती केली जाते. भातपीक हे मुख्य पीक आहे. खारआंबोळी गावची शेती सर्वात शेवट लावतात. करण अनेक ठिकाणी अतिपावसाने गावकऱ्यांचे राब वाहवून जातात. त्यामुळे गावची शेती लावून झाल्यावर उरलेले राब गावकऱ्यांना देण्यात येतात. असा सार्वजनिक हिताचा विचार हा गाव जपतो. या गावची लावणी पाहण्यासाठी छयाचित्रकार व पर्यटकदेखील आवर्जून भेट देतात.

## ताम्हिणी घाटात प्रवासी बस पलटली

अपघात झाला. या अपघातात बस रस्त्याच्या कडेला पलटली. अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपचारासाठी माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते.

निवडक

## क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

**वाघ्रण :** येथे क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम संपन्न झाला. पेढांबे प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या वाघ्रण उपकेंद्राच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपकेंद्राच्या प्रमुख सि.एच.ओ. सिया पाटील आणि कर्मचारी यांनी पुढाकार घेऊन अंगणवाडीत केलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी सरपंच राजेंद्र पाटील व सेवाश्रम सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष आणि टिबी मुक्त ग्रामपंचायत क्षेत्र उपकेंद्र समितीचे सदस्य पत्रकार दिपक पाटील यांनी दीप प्रज्वलन करून उद्घाटन केले.

## गांधी ग्रंथालयात कार्यक्रम

**पेण :** महात्मा गांधी ग्रंथालय व वाचनालय पेण येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महानिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रम पार पडले. भारताच्या संविधानाबाबत पथनाट्याद्वारे माहिती सादर करण्यात आली. आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह देवनार येथील मुलींनी संविधानावर पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाच्या समारोपात सर्व मुलींना पेन भेट देण्यात आले. महात्मा गांधी स्मारक संस्थेचे अध्यक्ष अरविंद वनगे व मंडळ सदस्य कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## बाबासाहेबांना विनम्र अभिवादन

**श्रीवर्धन :** येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे बौद्ध हितकारणी सभा तालुका श्रीवर्धन रायगड या संस्थेच्या वतीने शुक्रवारी (ता. ६) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तहसीलदार महेंद्र वाकलेकर व पोलिस निरीक्षक उत्तम रिकामे यांनी उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले व उपस्थितांना ६ डिसेंबर या दिवसाचे महत्त्व सांगितले.

## महापरिनिर्वाणदिनी अभिवादन

**माणगाव :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पुतळ्याला तंत्रशास्त्र विद्यापीठामध्ये कुलगुरू कर्नल प्राध्यापक डॉ. कारभारी काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. या अभिवादन व श्रद्धांजली वाहण्याच्या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, अधिष्ठाता शैक्षणिक डॉ. एस. एल. नलबलवार, अधिष्ठाता संशोधन आणि विकास डॉ. एस. एम. पोरे, विद्यापीठाचे सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप

**रसायनी :** धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान रायगड यांच्या माध्यमातून व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या विशेष सहकार्यातून ब्युटी पार्लरच्या यशस्वी लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाप्रसंगी डॉ. नितीन गांधी, डॉ. विजय कोकणे व प्रतिक्षा चव्हाण,सचिन चव्हाण,राजेंद्र देशमुख व दादासाहेब खंडाळे, ॲड.भावेश मयेकर, प्रशांत तावडे, सृष्टी मढवी, प्रियांका वर्तक, रेश्मा शेरखान व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते.

# सावधान! वेगावर कॅमेरे घालणार मर्यादा

## आता एआय तंत्रज्ञानाद्वारे होणार कारवाई

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहनांच्या वेगाला आता कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित कॅमेऱ्यांद्वारे आवर घातला जाणार आहे. इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) या संगणक प्रणालीअंतर्गत महामार्गावर ५२ कॅमेरे लावण्यात आले असून, वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांना आता दोन ते चार हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे.**



मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वाहनांचा वेग आणि निष्काळजीपणा अशा अनेक कारणांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले होते. शिवसंग्राम पक्षाचे अध्यक्ष विनायक मेटे यांच्या ऑगस्ट २०२२ मध्ये झालेल्या अपघाती निधनानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महामार्गावर आयटीएमएस प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) वाहतूक नियंत्रण व्यवस्थापन यंत्रणेचे (हायवेज ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम एचटीएमएस) काम हाती घेण्यात आले होते. दोन वर्षांच्या कालावधीनंतर ही यंत्रणा कार्यान्वित करून आरटीओकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. आरटीओच्या चाचणीनंतर तातडीने या प्रणालीचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. आता महामार्गाच्या दोन्ही बाजूंना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कॅमेरे लावण्यात आले आहेत.

**अशी असणार वेगमर्यादा**

| रस्त्याचा प्रकार | खासगी मोटार | व्यावसायिक मोटार आणि अवजड वाहने |
|---|---|---|
| घाट रस्ता | प्रतितास ६० किमी | प्रतितास ४० किमी |
| उतार रस्ता | प्रतितास ८० किमी | प्रतितास ६० किमी |
| सरळ रस्ता | प्रतितास १०० किमी | प्रतितास ८० किमी |

त्याद्वारे बेशिस्त वाहनचालकांवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

सीटबेल्ट न लावणे, वाहन चालविताना मोबाइलचा वापर करणे, वेगमर्यादेचे उल्लंघन केल्यास वाहनचालकांना ई-चलनद्वारे दंडात्मक कारवाईचा संदेश मोबाइल क्रमांकावर पाठविला जाणार आहे. मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालविणाऱ्यांचे प्रमाण जास्त असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगमर्यादा निश्‍चित करण्यात आली आहे.

तर पोलिसांकडून कारवाई महामार्गावर ३०० मीटर उंच अंतरावर हे कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनाचा वेग, चालकाच्या हालचाली स्पष्ट दिसतात. यामध्ये स्वयंचलित क्रमांक वाचणारे तंत्रज्ञान (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रीडर एएनपीआर) आहे. त्यामुळे वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन मार्गक्रमण करीत असल्यास संबंधित वाहनचालकाने वाहन नोंदणी करताना आरटीओत जो मोबाइल क्रमांक दिला आहे, त्या क्रमांकावर दंडात्मक कारवाईचा संदेश जातो. एखाद्या व्यक्तीचा क्रमांक बदलला असेल, वाहनावर क्रमांकाची पाटी नसेल, तर नोंदणी क्रमांकाच्या कोडवरून याबाबतची माहिती मिळवून पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे.

# वाघ्रणला चंपाषष्ठी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी

**। वाघ्रण । वार्ताहर ।**

मार्गशिर्ष शुद्ध प्रतिपदा ते मार्गशिर्ष शुद्ध षष्ठी असा वाघ्रण येथे चंपाषष्ठी उत्सव विविध कार्यक्रमानी संपन्न झाला. सोमवारी (दि.२)ते शनिवारी (दि.७) कडेपठार कुलदैवत श्री . खंडोबा भक्त दिपक पाटील यांच्या वाघ्रण निवासस्थानी सलग दहाव्या वर्षी सार्वजनिक स्वरूपात मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या उत्सवात विविध कार्यक्रम झाले. शास्त्रशुद्ध पद्धतीने दिपक पाटील यांनी सपत्नीक पूजन करून सुरू झालेल्या या उत्सवाला रोज सकाळ महाआरत्यांसोबत रात्री जागरण म्हणून सहा दिवसात श्री. हनुमान प्रासादिक भजन मंडळ वाघ्रण यांचे भजन, अलंकार पाटील आणि मित्र यांचा वाद्यवृंद, गोपाळ कृष्ण प्रासादिक भजन मंडळ मानकुळे यांचे भजन, शिव भैरव गोंधळ मंडळ शहाबाज यांचा श्री. खंडोबा अख्यान गोंधळ आणि समारोपाला रेवदंडा येथील किर्तनकार संदीप केळकर यांचे किर्तन असे कार्यक्रम झाले.

या सर्व मंडळाच्या प्रमुखांचे स्वागत मानपान देऊन संयोजकांनी केले. तर आभार वाघ्रण वार्ताहर दिपक यशवंत पाटील यांनी संयोजकांच्या वतीने मानले. दुतर्फा भव्य मंडप तेवढीच विद्युत रोशनाई आणि नितीन गोरखनाथ पाटील यांची साऊंड सिस्टीम यामुळे संपूर्ण गावात उत्साह होता. पहिल्या दिवसापासून समारोपापर्यंत मोठी गर्दी होती. तर रोज चहापान आणि जेवण व्यवस्था केली होती.

समारोपाच्या महाप्रसादाला तर तालुक्यातून व मुंबई येथून देखील मंडळी आली होती. शेवटी हा उत्सव कुटुंब परिवार मित्र भाऊबंद व ग्रामस्थांच्या सहकार्य व व्यवस्थापन हातभार लाभल्याने सार्वजनिक स्वरूपात उत्साहात झाल्याची प्रतिक्रिया कडेपठार भक्त संयोजक दिपक पाटील यांनी व्यक्त केली. सहा दिवसात भाविकांनी भक्तिमय कार्यक्रमाचा आनंद घेतला.

# शाळांच्या प्रसाधनगृहात आता गजराची व्यवस्था

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नव्याने उपाययोजना राबवण्यासाठी धोरण तयार करण्यात आले आहे. त्यानुसार शाळांच्या प्रसाधनगृहांमध्ये गजर, शाळा परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली असणे, तक्रार पेटी अशा तरतुदींचा त्यात समावेश असून, शाळा व्यवस्थापनाने शाळा स्तरावर तातडीने संबंधित उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी यांनी या बाबत माहिती दिली. राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत धोरण निश्‍चित करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश साधना जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. या बैठकीत समितीने म ान्यताप्राप्त शाळांनी तातडीने करायच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शालेय व्यवस्थापनाने शाळा स्तरावर विद्यार्थी सुरक्षिततेसाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

**विद्यार्थी समुपदेशनासाठी शिक्षक नियुक्ती**

**प्रत्येक शाळेत उपलब्ध शिक्षकांमधून एका शिक्षक विद्यार्थी समुपदेशनासाठी नियुक्त करणे आवश्यक करण्यात आले आहे. समुपदेशक शिक्षकांना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे प्रशिक्षण देण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.**

राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये प्रसाधनगृह स्वच्छ व वापरण्यायोग्य असणे, सहा वर्षाखालील मुलांची काळजी घेण्यासाठी महिला कर्मचारीच असणे, प्रसाधनगृहामध्ये अलार्म किंवा गजर व्यवस्था असणे, शालेय परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असणे, सीसीटीव्ही चित्रीकरण किमान एका महिना साठवणे, शालेय विद्यार्थी वाहतुकीसाठी महिला कर्मचारी असणे, शाळेत तक्रार निवारण समिती कार्यान्वित करून नियमित बैठका घेणे, शाळेतील तक्रारपेटी आठवड्यातून किमान दोन वेळा पालक-शिक्षक समितीचे अध्यक्ष, सखी सावित्री समितीचे अध्यक्ष यांच्यासमोर उघडणे, त्यातील तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे, शाळांमध्ये बालसंरक्षण समिती स्थापन करणे, सखी सावित्री समिती कार्यान्वित करून विविध कार्यक्रम राबवणे, शाळा सुटल्यावर शालेय परिसरात एकही विद्यार्थी थांबणार नाही याची खात्री शिक्षकांनी करणे, अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत.

# मुरुड तालुक्यात क्षयरोग मुक्त मोहिमेला सुरुवात

**। कोर्लई । वार्ताहर ।**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात १०० दिवसीय क्षयरोग शोध मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या १०० दिवसीय क्षयरोग मोहिमेमध्ये सर्वांनी सक्रीय सहभाग घ्यावा. तसेच सन २०२५ पर्यंत जिल्हा क्षयमुक्त होईल यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.



या मोहिमेचा उद्देश हा जास्तीत जास्त क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचारावर आणणे, क्षय रुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, नवीन क्षय रुग्णांचे प्रमाण कमी करणे, वंचित व अतिजोखमीच्या घटकापर्यंत पोहोचून आरोग्य सेवा पुरवणे, क्षयरोगाविषयी जनजागृती करणे, समाजामधील क्षयरोगाविषयी जनजागृती करणे व सामाजिक कलंक कमी करण्यासाठी उपक्रम राबविणे, जिल्हयातील संमती दिलेल्या क्षयरुग्णांची पंतप्रधान क्षय मुक्त भारत अभियानांतर्गत निक्षयमित्र यांच्याकडुन पोषण आहार कीटचे वाटप करणे असा आहे. त्याचाच भाग मुरुड तालुक्यात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत १०० दिवसीय टीबी मुक्त भारत अभियान राबविण्यात येणाऱ्या मोहिमेचा शुभारंभ क्षयरोग पथक मुरुड तर्फे ग्रामीण रुग्णालय मुरुड, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व सर्व उपकेंद्रात करण्यात आला. यावेळी ग्रामीण रुग्णालय येथे प्रमुख पाहुणे डॉ.एम.ए.कोकाटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.उषा चोले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड, सर्व आरोग्य कर्मचारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.


१०० दिवसांच्या कालावधीत ६० वर्षांवरील सर्व लोकांची, बाधित, कर्करोग बाधित, डायबिटीस बाधित, धूम्रपान करणारे, दारूच्या आहारी गेलेल्या, वीटभट्टीवर काम करणाऱ्या तसेच आश्रम गृहातील मुलांची १०० टक्के तपासणी करण्यात येणार आहे. तसेच समाजामध्ये मोठ्या प्रमाणात क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या वेळी डॉ. कोकाटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, समाजातील सर्व व्यक्तींनी या मोहिमेचा लाभ घेऊन तपासणी करून घेण्याचे आव्हान केले. तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. उषा चोले यांनी उपस्थित सर्वांनी क्षयरोगाची लक्षणे, मोफत उपचार, निक्षयमित्र याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

# कर्जत बाजारपेठेत उभ्या राहणाऱ्या रिक्षांमुळे वाहतूक कोंडी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील वाहतूक कोंडी हि मुख्य समस्या असून शहरातील वाहतूक कोंडी वाढविण्याचे मुख्य कारण हे बाजारपेठेमध्ये रिक्षा उभ्या करून ठेवल्या जात असतात. नगरपालिकेने ठरवून दिलेल्या स्टॅण्डऐवजी बाजारपेठेत कुठेही उभ्या असतात. त्यामुळे पालिकेने रिक्षा स्टॅण्डमध्ये रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या रिक्षांना थांबा मंजूर करून द्यावा किंवा पोलिसांनी कारवाई केल तरच वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.



शहरातील वाहतूक कोंडी केवळ सणाच्या काळात नसते. तर कर्जत स्टेशन परिसरातील बाजारपेठेतील वाहतूक कोंडी हि नित्याची बनली आहे. उपनगरीय लोकल किंवा एक्सप्रेस गाड्या पकडण्यासाठी धावपळ करणारे कर्जतकर यांना सकाळी रस्त्यावर अस्तव्यस्त लागलेल्या गाड्या त्रास देतात.शहरातील मुख्य बाजारपेठ तसेच महावीर पेठ आणि पोलीस मैदानासमोरील रस्त्यावरील वाहतूक कोंडी नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. हि वाहतूक कोंडी दैनंदिन असल्याने कर्जत शहरातील नागरिक या वाहतूक कोंडीपासून कधी सुटणार हा प्रश्‍न कायम आहे.

# खारघर खाडीत देशी-विदेशी पाहुण्यांचे आगमन

**। पनवेल । वार्ताहर ।**

थंडीची चाहूल लागताच अनेक स्थलांतरित पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून आपल्याला अनुकूल प्रदेशात जात असतात. सध्या निसर्गाचे वरदान लाभलेल्या खारघर खाडीत देशी-विदेशी पक्ष्यांची रेलचेल पाहावयास मिळत असून, पक्षीप्रेमी पक्षी निरीक्षणाचा आनंद घेण्यासाठी येथे येत आहेत.



खारघर सेक्टर ८, १०, १६, १७ मधील वास्तुविहार तसेच रांजणपाडा आणि मुर्बी गावाच्या मागील बाजूस खाडी आहे. सध्याच्या घडीला या ठिकाणी विविध रंगी, आकर्षक पक्ष्यांचे थवे दिसू लागले आहेत आणि त्यांची छबी टिपण्यासाठी पक्षीप्रेमींमध्ये चढाओढ निर्माण झाली आहे. खाडीकिनारा असलेली पाणथळ जागा पक्ष्यांसाठी नेहमीच आकर्षणाच्या केंद्र ठरल्या आहेत. थंडीची चाहूल सुरू होताच पक्ष्यांनी या ठिकाणी मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे. यामध्ये रशिया आणि मध्य आशियामधील स्थलांतरित पक्ष्यांचे खारघरमध्ये मोठ्या संख्येने आगमन झाले आहे. यामध्ये आफ्रिकेतील रोहित (फ्लेमिंगो), सारस बगळे, रेड बुलबुल, बी इटर, गुलाबी स्टारलिंग, कॉमन किंगफिशर, पॅसिफिक गोल्डन प्लेव्हर, जांभळा हेरॉन, मार्श हॅरिअर, चिमणी, घार, गरुड, किंगफिशर, लाजरी पाणकोंबडी, शराटी, शेकाटे, पाणकावळे, दुर्मिळ ब्लॅक टेलेड गॉडविट्स, कर्ल्यू सँडपायपर्स या पक्ष्यांनी खारघर खाडीमध्ये आपले बस्तान मांडल्यामुळे पक्षीप्रेमींमध्ये उत्साह संचारला आहे.


खारघरला निसर्गाने मोठ्या प्रमाणात खाडीकिनारा उपलब्ध करून दिला आहे, मात्र त्याकडे सिडको, पनवेल पालिका आणि वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे डेब्रिजमाफिया मोठ्या प्रमाणात डेब्रिजचा भराव करीत आहेत. तसेच काहींनी शेड उभारले असून, शेडपर्यंत चारचाकी वाहन जावे यासाठी डेब्रिजचा भराव करून रस्ता तयार केला आहे.

## वीकेंडला रुचकर पोपटीचे बेतांचे पीक

# उरणच्या बाजारात वालाच्या शेंगा


**। उरण । वार्ताहर ।**

सध्या बाजारात हंगामातील पहिले वालाचे पीक दाखल झाले आहे. त्यामुळे उरणच्या ग्रामीण भागात प्रसिद्ध असलेल्या रुचकर, मसालेदार पोपटीचे आकर्षण वाढू लागले आहे. वीकेंडला सध्या उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगाची पोपटी करण्याचे बेत ठरू लागले आहेत.



**पोपटी कशी करतात?**

**पोपटी शाकाहारी आणि मांसाहारी अशी दोन्ही प्रकारची असते. शेताच्या बांधावर भांबुर्डीचा पाला एका मातीच्या मडक्यात भरला जातो. त्यात वालाच्या, मटारच्या शेंगा, मीठ आणि पुन्हा वर पाला असे थर रचतात.**



**यासह चिकन, अंडीही ठेवून मडक्याचे तोंड गच्च बांधले जाते. एखादी चांगली जागा बघून तेथे मडके जमिनीवर उलटे ठेवतात. या मडक्यावर, आजूबाजूला भाताची सुकलेली पेंडी, शेतातील सुका पालापाचोळा, गवत टाकून आग पेटवली जाते. पाण्याचा अजिबात वापर होत नाही. आगीच्या वाफेवर पोपटी शिजते.**


दिवाळी संपली की मग चाहूल लागते ती थंडीची. हळूहळू हवेत गारवा निर्माण होऊ लागतो. दिवाळीच्या वेळेत भाताची कापणी झाली की लगेचच वाल, मटार, चवळी आदि कडधान्ये,पालेभाज्या शेतात पेरले जातात. ती पूर्ण बहरली की मग त्याची कापणी केली जाते अशा थंडीच्या मोसमात मित्रमैत्रिणींसोबत चटकदार पोपटीवर ताव मारण्याची मजा काही औरच असते. कोकणातील प्रसिद्ध परंपरा म्हणून किंवा जीवनशैलीचा एक भाग म्हणून पोपटीचे आयोजन केले जाते. त्यातही रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात थंडीच्या दिवसात सर्वत्र पोपटीचे बेत रंगतात. जुन्या लोकांच्या मते पोपटी सर्वप्रथम अलिबागमध्ये करण्यात येऊ लागली. नंतर हळूहळू त्याचे लोण सर्वत्र पसरले. आजही जिल्ह्याचे महत्वाचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अलिबागचे शहरीकरण होत असले तरी ग्रामीण खाद्यसंस्कृतीचा भाग असलेली पोपटीचे आजही मोठ्या प्रमाणात सर्वत्र आयोजन केले जाते. उरण आणि रायगड परिसरातील वालाच्या पोपटाची चव ही अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांतही पोहचली आहे. येथील परदेशी पाहुणे चिरनेर परिसरात या पोपटीचा आस्वाद घेण्यासाठी येत आहेत.

वालाचे पीक हे दोन प्रकारे घेतले जाते. एकतर भात कापणीनंतर वाल लावले जातात. पाण्यावरील वाल आणि दवावरील वाल असे दोन प्रकार आहेत. यातील थंडीत दवावर पिकविण्यात येणारे वाल जानेवारी अखेरपर्यंत बाजारात येणार असल्याची माहिती चिरनेर मधील शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली. तर सद्याचे वाल हे पाण्यावरील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दवावर पिकणारे वाल हे चविष्ट आणि नैसर्गिक वाल असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कुंभार व्यवसायाला सुगीचे दिवस

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर कुंभारपाडा हे मूर्तीकला आणि मातीची भांडी यासाठी प्रसिद्ध आहे. लोकांनी संसार उपयोगी मातीची भांडी वापरण्याकडे पाठ फिरवली होती. त्यामुळे मातीची भांडी वापरण्याचे प्रमाणही कमी झाले होते. परंतु अलीकडे वाढते प्रदूषण आणि प्लास्टिकच्या वस्तूंचा अतिरिक्त वापर यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा अनुभव लोकांना येऊ लागल्याने, पुन्हा एकदा अन्न शिजवण्यासाठी मातीच्या भांड्यांचा वापर होताना दिसू लागला आहे. अनेक लोक मातीच्या भांड्यामध्ये स्वयंपाक करणे पसंत करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातूनही मोठ्या प्रमाणावर मातीच्या भांड्यांना मागणी वाढली आहे. त्यामुळे मातीची भांडी बनविणाऱ्या कारागिरांना सुगीचे दिवस आले आहेत.



मातीच्या भांड्यात अन्नाची चव आणि पोषणतत्वे टिकून राहत आहेत. त्यातून अन्नाची चव पौष्टिकता आणि सुगंध अधिक वाढतो. त्यामुळे सध्या बहुतांशी लोक मातीच्या भांड्यांमध्ये स्वयंपाक करणे पसंत करत आहेत. या मातीच्या भांड्यांना खूप मागणी आहे त्यामुळे येथील कुंभार कारागिरांचा व्यवसाय देखील चांगला वाढत आहे. मातीची भांडी आणि कुंभारकाम व्यवसायाला सुगीचे दिवस आले आहेत. विशेष म्हणजे मातीच्या भांड्यात अन्नाची चव व पोषक तत्वे टिकून राहत असून, अन्नाची चव, पौष्टिकता व सुगंध अधिक वाढतो.

त्यामुळे सध्या ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातील नागरिक देखील मातीच्या भांड्यांमध्ये स्वयंपाक करणे पसंत करीत आहेत. मातीची मातीच्या भांड्यांना वाढती मागणी असल्यामुळे आमच्या कुंभार व्यवसायला व कारागिरांना रोजगार उपलब्ध होत आहे.

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# शुद्ध पाताळयंत्रीपणा

महाराष्ट्रातल्या निवडणुकांचे परिणाम देशभर होऊ लागले आहेत. विशेषतः दिल्लीचे राजकारण पुन्हा बदलू लागले आहे. लोकसभेनंतर भाजप थोडा दबून होता. आता पुन्हा त्याच्या नेत्यांनी फणा काढला आहे. अदानी प्रकरणावर चर्चा करावी या मागणीसाठी विरोधकांनी पहिला आठवडाभर लोकसभेचे कामकाज रोखून धरले. त्यावेळी भाजपने कोणत्याही स्थितीत चर्चा नाही अशीच भूमिका घेतली. नंतर विरोधकांनी तडजोड करून चर्चेला सुरूवात करताच भाजपच्या खासदारांनी अदानीचा मुद्दा उलटवण्याचा प्रयत्न केला. संसदेच्या काळात परदेशी संस्थांनी काहीतरी आरोप करणे आणि त्याआधारे काँग्रेसने संसदेचे कामकाज रोखून धरणे यात परदेशी कारस्थान आहे असा दावा भाजपच्या खासदारांनी केला. गंमत म्हणजे लोकसभा आणि राज्यसभेच्या अध्यक्षांना आदल्या आठवड्यात अदानीतला अ देखील उच्चारलेला खपत नव्हता. ते या विषयावर भाजपच्या सदस्यांना वाटेल ते बेलगाम बोलू द्यायला तयार होते. शिकारीच्या वेळी निव्वळ भुंकून रान उठवणारे काही कुत्रे असतात. तशी भूमिका भाजपने आपल्या काही गणंग नेत्यांवर सोपवलेली आहे. हे नेते विरोधकांवर कोणत्याही थराला जाऊन टीका करू शकतात. संबित पात्रा, दुबे, स्मृती इराणी ही त्यातली काही नावे आहेत. राहुल गांधी यांना जॉर्ज सोरोसचा पैसा मिळत असल्याचा भाजपचा आरोप आहे. आदल्या दिवशी पात्रा यांनी पत्रकार परिषदेत हा आरोप केला. राहुल गांधी हे अव्वल दर्जाचे देशद्रोही आहेत, असे पात्रा म्हणाले. त्याबद्दल काँग्रेसने लोकसभेत नोटीस दिली होती. ती स्वीकारायची की नाही याचा निर्णय अध्यक्षांनी प्रलंबित ठेवला. मात्र याच विषयावर निशिकांत दुबे यांना बोलू मात्र दिले. मग ठरवल्याप्रमाणे दुबे यांनी वाटेल ते आरोप केले. लोकसभेत बोलणाऱ्या सदस्यांना संरक्षण असते. त्यांच्यावर कोणतीही कारवाई होऊ शकत नाही. त्याचा फायदा उठवत आणि लोकसभेचे अध्यक्ष वगैरे आपल्याच खिशातले असल्याने दुबे आणि इतर मंडळी वाटेल ते बोलत असतात.

### अदानीची चर्चा टाळण्यासाठी

त्यानुसार या मंडळींनी काँग्रेस व राहुल यांना पुन्हा शिव्या दिल्या. सोरोस आणि राहुल हे दो जिस्म एक जान असल्याची घाणेरडी टीका त्यात होती. साहजिकच काँग्रेसने त्याला आक्षेप घेतला व गदारोळ झाला. लोकसभा पुन्हा ठप्प झाली. आदल्या आठवड्यात काँग्रेस लोकसभा चालू देत नाही म्हणून भाजपवाले गळा काढत होते. तो किती नाटकीपणा व ढोंगीपणा होता हे यामुळे स्पष्ट झाले. राहुल गांधी यांच्यावर जाणूनबुजून खोटे आरोप करायचे आणि सर्व चर्चा दुसरीकडे भरकटवायची असा हा सर्व कट आहे. अदानीबाबत चर्चेच्या मागणीला काँग्रेस देशद्रोही असल्याचे वळण देऊन आपण भलतीच चतुराई करीत असल्याचा भाजपचा समज असावा. पण लोक इतके मूर्ख नसतात. लोकसभा अध्यक्ष जर निःपक्ष असते तर असले हलके प्रकार संसदेत चाललेच नसते. यात ज्या जॉर्ज सोरोसचे नाव घेतले जाते त्याबाबत भाजपने पूर्वीही असेच गरळ ओकून झाले आहे. तीन वर्षांपूर्वी दिल्लीत शेतकऱ्यांचे आंदोलन झाले त्याला पाठिंबा देणाऱ्यांवरही असेच नादानपणाचे आरोप झाले होते. हा सोरोस अमेरिकन गुंतवणूकदार आहे. शेअर बाजारात तसेच कंपन्यांमध्ये तो गुंतवणूक करतो. त्यातून हजारो कोटी डॉलर्सचा फायदा मिळवतो. या नफ्यातला मोठा हिस्सा तो जगभरात चांगली कामे करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना देत असतो. त्यामुळे सर्वच देशातील हुकुमशाही सत्ताधीशांचा त्याच्यावर राग असतो. भारतात पर्यावरणविषयक किंवा अन्य कामे करणाऱ्या संस्थांना त्याचे पैसे मिळालेही असतील. पण काँग्रेस त्याच्या पैशाने व इशाऱ्याने आंदोलने करते हा अत्यंत गंभीर आरोप आहे. काँग्रेस हा एक मान्यताप्राप्त पक्ष आहे. लोकसभेत त्याचे शंभर खासदार आहेत. सत्तारुढ दलावर टीका करणे आणि त्याच्या उणिवा दाखवणे हे त्याचे कामच आहे. त्या कामाला परदेशी कारस्थान ठरवणे हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. मोदींवर टीका किंवा भाजपला विरोध म्हणजे देशद्रोह असे समीकरण जोडण्याचा हा प्रयत्न देशाला भयंकराकडे नेणारा आहे.

### उठसूठ देशद्रोहीपणाचा आरोप

अदानीविरुध्द गेल्या दोन वर्षांपासून आरोप चालू आहेत. आधी हिंदेनबुर्ग अहवाल आला. त्यात अदानीच्या कंपन्यांमध्ये बेनामी परदेशी पैशांची गुंतवणूक झाल्याचा गंभीर आरोप होता. वास्तविक याबाबत सीबीआय व इतर यंत्रणांमार्फत चौकशी गरजेची होती. पण हे सर्व सेबीच्या चौकशीवर भागवण्यात आले. सेबीच्या प्रमुख माधबी बुच यांची यातली भूमिका संशयास्पद आहे. खुद्द त्यांच्यावरच अदानीच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक असल्याचे आरोप आहेत. तरीही केंद्र सरकारने त्यांच्यावर काहीही कारवाई करण्याचे टाळले. अदानीविरुध्दचे ताजे आरोप हे खासगी संस्थेचे नसून अमेरिकी पोलिसांनी केलेले आहेत. अदानींनी दोन हजार कोटी रुपयांची लाच काही राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांना दिली व त्या बदल्यात त्यांच्या सौरउर्जेची चढ्या भावाने खरेदी सुरू झाली असा अमेरिकी तपास यंत्रणांचा दावा आहे. त्याचे पुरावे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. हा गंभीर आरोप आहे. काँग्रेसच नव्हे तर कोणीही देशप्रेमी माणूस या आरोपांची चौकशी झाली पाहिजे असेच म्हणेल. कारण हा शेवटी केवळ अदानीचा नव्हे तर देशाच्या इभ्रतीचाही प्रश्न आहे. प्रत्यक्षात अदानीवर कारवाई करण्याऐवजी मोदींचे सरकार पुन्हा एकदा त्यांच्या बचावासाठी उभे राहिलेले दिसते. हिंदेनबुर्ग असो की धारावीचा प्रकल्प असो प्रत्येक वेळी अदानीला वाचवण्यासाठी मोदी सरकार धावून येत असते. तसे ते आले आहे. अदानीवरचे सर्व आरोप आपल्यावर घेऊन हा देशाची अर्थव्यवस्था अस्थिर करण्याचा कट असल्याचे भाजपने म्हटले आहे. उद्या राज्यात अजित पवार किंवा देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली तरीही त्याबाबत भाजपवाले कदाचित असेच म्हणू लागतील. एकीकडे अर्थव्यवस्थेवर हल्ला असे म्हणायचे आणि दुसरीकडे काँग्रेसला सोरोस किंवा अन्य कोणाकडून पैसे येत असल्याचे सांगून तिच्याविषयी शंका निर्माण करायची हा भयानक पाताळयंत्रीपणा आहे. दुर्दैवाने सामान्य माणसाला इतके बारकावे कळत नाहीत. तो भाजपच्या प्रचाराला कसा बळी पडत जातो हे महाराष्ट्राच्या निवडणुकीत दिसलेच.

विचार

# ‘दूरसंचार’ देणार रोजगार, अदानी गपगार

***महागाई, दरवाढ, परकीय गुंतवणूक या नियमित विषयांपलिकडच्या काही बातम्या सरत्या काळात नजरेत भरल्या. भारतीय ग्रीसमध्ये सर्वाधिक मालमत्ता खरेदी करत असल्याची बातमी त्यापैकी एक. मायक्रोसॉफ्ट, ॲपलपेक्षा अरामकोचा नफा जगात सर्वाधिक असल्याची वार्ताही अशीच. ‘मूडीज’ने अदानींचा मूड खराब केल्याची लक्षवेधी बातमीही अशीच. दरम्यान, दूरसंचार क्षेत्रात एक लाख नवीन नोकऱ्या निर्माण होणार आहेत.***

**महेश देशपांडे**

महागाई, रिअल इस्टेट, रिझर्व्ह बँकेचे फतवे या नेहमीच्या विषयांपलिकडच्या काही बातम्या सरत्या आठवड्यामध्ये नजरेत भरल्या. त्यामुळे त्या दखलपात्र भासल्या. भारतीय मंडळी ग्रीसमध्ये सर्वाधिक मालमत्ता खरेदी करत असल्याची माहिती अलिकडेच समोर आली. ॲपल, मायक्रोसॉफ्ट नव्हे, तर अरामकोचा नफा जगात सर्वाधिक असल्याची वार्ताही भुवया उंचावून गेली. ‘मूडीज’ने अदानींचा मूड खराब केल्याची लक्षवेधी बातमीही अशीच. दरम्यान, दूरसंचार क्षेत्रात एक लाख नवीन नोकऱ्या निर्माण होणार आहेत.

भारतात मालमत्तेचे दर गगनाला भिडत आहेत. देशातील टॉप पाच शहरांमध्ये घर घेण्याचा विचार केल्यास दर ऐकून चक्कर येऊ शकते; मात्र त्यानंतरही देशातील लोक केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही मोठ्या प्रमाणावर मालमत्ता खरेदी करत आहेत. ‘मनी कंट्रोल’च्या अहवालानुसार सर्वाधिक भारतीय ग्रीसमध्ये मालमत्ता खरेदी करतात. या बाबतीत तुर्कस्तान दुसऱ्या स्थानावर आहे. या देशातही भारतीय लोक मालमत्तेत मोठी गुंतवणूक करत आहेत. तुर्कस्तानमध्ये जवळपास ९९ टक्के लोक इस्लाम धर्म मानतात. तिसऱ्या क्रमांकावर कॅरेबियन देश आहेत, जिथे भारतीय मालमत्तांमध्ये सर्वाधिक गुंतवणूक करतात. याशिवाय माल्टा आणि स्पेनमध्येही भारतीय मोठ्या प्रमाणावर घरे खरेदी करत आहेत. इतर देशांमध्ये मालमत्ता खरेदी करताना गोल्डन व्हिसा हा भारतीयांचा पहिला विचार असतो. याशिवाय भारतीयांचे नेहमीच परदेशातही स्वतःचे घर असण्याला प्राधान्य असते. कोणत्याही देशाने घर खरेदी करण्याची संधी दिल्यास भारतीय तेथे गुंतवणूक करतात. ब्रिटन आणि सौदी अरेबियासारखे देश याची उत्तम उदाहरणे आहेत. सर्वसामान्य भारतीयांशिवाय बड्या स्टार्सनीही या देशांमध्ये घरे खरेदी केली आहेत. ग्रीसने २०१३ मध्ये ‘गोल्डन व्हिसा प्रोग्राम’ सुरू केला. यानुसार रिअल इस्टेट, सरकारी रोखे किंवा इतर मंजूर साधनांमध्ये किमान दोन कोटी २१ लाख ७५ हजार २५० रुपये गुंतवणूक करणाऱ्या कोणत्याही परदेशी व्यक्तीला ग्रीक सरकार गोल्डन व्हिसा जारी करते. ग्रीसव्यतिरिक्त संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया, अमेरिका यासारखे देशदेखील छोट्या गुंतवणुकीवर गोल्डन व्हिसा देतात.

आता अशीच एक खास बातमी. जगातील सर्वात जास्त नफा कमावणाऱ्या कंपन्यांची चर्चा होते, तेव्हा आपल्या मनात ॲप्पल आणि मायक्रोसॉफ्ट सारख्या कंपन्यांचे नाव येते. त्यानंतर आपण विचार करतो की ज्या देशाची अर्थव्यवस्था मोठी, जो देश सर्वात पॉवरफुल त्याच देशाची कंपनी सर्वात जास्त नफा कमावत असेल; परंतु असे नाही. सौदी अरेबियाची अरामको ही कंपनी जगात सर्वाधिक नफा कमावणारी कंपनी आहे. तेल उत्पादन करणारी ही कंपनी सौदी अरब येथील धाहराण येथे स्थित आहे. या कंपनीने नफ्याच्या बाबतीत जगातील बड्या कंपन्यांनाही मागे टाकले आहे. ॲपल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यादेखील याबाबत या मुस्लिम देशातील कंपनीची बरोबरी करु शकत नाहीत. ‘प्रॉफिट स्टॅटिस्टिक’च्या अहवालानुसार तेल आणि ऊर्जा क्षेत्रात काम करणारी सौदी अरब सरकारच्या सौदी अरामको कंपनीने २०२३ मध्ये २४७.४३ अब्ज डॉलर नका कमावला आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या ॲपल कंपनीने ११४.३ अब्ज डॉलर नफा कमावला आहे. तिसऱ्या क्रमांकावर बर्कशायर हॅथवे ही कंपनी आहे. या कंपनीने २०२३ मध्ये १००.३ अब्ज डॉलरचा नफा कमावला. या यादीत दिग्गज टेक कंपनी मायक्रोसॉफ्टचा क्रमांक चौथा आहे. मायक्रोसॉफ्टने २०२३ मध्ये ९५.०२ अब्ज डॉलर नफा कमावला आहे.

या यादीत पाचवा क्रमांक अल्फाबेट कंपनीचा आहे. गुगलची पॅरेंट कंपनी असलेल्या अल्फाबेटने २०२३ मध्ये ७८.७८ अब्ज युएस डॉलरचा नफा कमावला आहे. सौदी अरामको ही कंपनी सौदी अरब सरकारच्या मालकीची आहे. सौदीच्या अर्थव्यवस्थेचा ती कणा मानली जाते. सौदी अरामकोचे संपूर्ण नाव सौदी अरेबियन ऑईल कंपनी असे आहे. ही जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादन आणि ऊर्जा कंपन्यांपैकी एक आहे. अरामको तेल गॅस उत्पादन, संशोधन आणि वितरणाशी संबंधित कामे करते. या कंपनीचे संचालन आणि व्यवस्थापन सौदी अरब सरकार करते. २०१९ मध्ये या कंपनीचा छोटा भाग सार्वजनिक केला गेला आणि रियाल स्टॉक एक्सचेंजवर लिस्टींग केले गेले. आजच्या तारखेला या रियाद स्टॉक एक्सचेंजमध्ये याच्या शेअरचा भाव सुमारे २७.५० सौदी अरेबियन रियाल इतका आहे.

आता एक कटाक्ष अदानींच्या साम्राज्याकडे. भारतापासून अमेरिकेपर्यंत सर्वत्र गौतम अदानींसाठी वाईट बातम्या येत आहेत. आता न्यूयॉर्कमधून वाईट बातमी आली आहे. ‘मूडीज’ या रेटिंग एजन्सीने अदानींच्या सात कंपन्यांचे क्रेडिट रेटिंग स्थिर ते नकारात्मक केले. असे करण्यासाठी ‘मूडीज’ने समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी आणि इतरांवर लाचखोरीच्या आरोपाचा दाखला दिला. ‘फिंच रेटिंग्ज’ने समूहाचे काही बाँड्स नकारात्मक श्रेणीत ठेवले आहेत.

‘मूडीज’ने ‘अदानी पोर्टस् अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड’, ‘अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड’चे दोन मर्यादित प्रतिबंधित गट, ‘अदानी ट्रान्समिशन स्टेप-वन लिमिटेड’, ‘अदानी ट्रान्सपोर्टेशन रिस्ट्रिक्टेड ग्रुप १’ (एईएसएल आरजी१), ‘अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड’ आणि ‘अदानी इंटरनॅशनल कंटेनर’ या सातही कंपन्यांची श्रेणी घटवली आहे. ‘अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड’चे अध्यक्ष गौतम अदानी आणि अनेक वरिष्ठ व्यवस्थापन अधिकाऱ्यांच्या विरोधात अमेरिकी ॲटर्नी ऑफिसच्या फौजदारी आरोपामुळे अदानी समूहाचा वित्तपुरवठा कमकुवत होऊ शकतो आणि त्याचा भांडवली खर्च वाढू शकतो, असे ‘मूडीज’ने म्हटले आहे. ‘मूडीज’च्या मते कायदेशीर कार्यवाही कोणत्याही नकारात्मक क्रेडिट प्रभावाशिवाय संपुष्टात आल्यास रेटिंगचा दृष्टिकोन स्थिर ठेवला जाऊ शकतो. बाजारातील वादळात अदानींनी २८८ अब्जाधीश गमावले. याव्यतिरिक्त ‘फिंच’ने ‘अदानी एनर्जी’ आणि ‘अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई’चे रेटिंग नकारात्मक वॉच लिस्टमध्ये ठेवले.

‘टीमलीज सर्व्हिसेस’चे मुख्य स्ट्रॅटेजी ऑफिसर सुब्बुराथिनम पी. यांच्या मते भारतातील ब्रॉडबँड आणि ‘फाईव्ह जी’ नेटवर्कचा पुढील पाच वर्षांमध्ये वेगवान विस्तार होणार आहे. फायबर स्थापना, देखभाल आणि दुरुस्ती क्षेत्रात सुमारे एक लाख नवीन रोजगार निर्माण होतील. येत्या काळात भारताची दूरसंचार बाजारपेठ झपाट्याने वाढणार आहे. भारताची दूरसंचार बाजारपेठ २०२४ मध्ये ४८.६१ अब्ज डॉलरची असण्याचा अंदाज आहे. २०२९ पर्यंत ती ७६.१६ अब्ज डॉलरपर्यंत वाढू शकते. दर वर्षी ती सुमारे ९.४० टक्के दराने वाढत आहे. २०२३ पर्यंत देशभरात सुमारे सात लाख किलोमीटर ऑप्टिकल फायबर केबल्स टाकण्यात आल्यामुळे डिजिटल पायाभूत सुविधांच्या विस्तारात या यंत्रणेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सुब्बुराथिनम सांगतात, भारतात ब्रॉडबँड आणि ‘फाईव्ह जी’ नेटवर्कच्या वेगवान विस्तारामुळे फायबर ऑप्टिक तंत्रज्ञांच्या मागणीत मोठी वाढ होत आहे. आता या क्षेत्रातील रोजगाराची मागणीही वाढेल. भारतातील टेलिकॉम टॉवर्सच्या वाढीव फायबरायझेशनमुळे रोजगाराच्या अंदाजे एक लाख नवीन संधी निर्माण होऊ शकतात.

सध्या, भारतात ‘फोर जी’, ‘फाईव्ह जी’ आणि ब्रॉडबँड योजनांना समर्थन देण्यासाठी वेगाने वाढणाऱ्या फायबर ऑप्टिक नेटवर्कचा विस्तार करण्यात पाच लाखांहून अधिक फायबर तंत्रज्ञ कार्यरत असल्याचा अंदाज आहे. नोकियाला ‘भारती एअरटेल’कडून भारतात ‘फाईव्ह जी’ विस्ताराचे प्रचंड मोठे कंत्राट मिळाले आहे. सुब्बुराथिनम म्हणाले की ‘फाईव्ह जी’तंत्रज्ञान २०३० पर्यंत त्याच्या शिखरावर पोहोचेल. ते वेगवान इंटरनेट गती, कमी विलंब आणि चांगली कनेक्टिव्हिटी प्रदान करेल.

टेलिकम्युनिकेशन, आयटी, बांधकाम आणि उत्पादन यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये फायबर तंत्रज्ञांची नियुक्ती केली जात आहे. तिथे हे व्यावसायिक विशेषतः शहरी आणि ग्रामीण भागात नेटवर्क विस्तार आणि पायाभूत सुविधा सेट अपवर काम करत आहेत. फायबर तंत्रज्ञांचा उलाढाल दर खूपच जास्त आहे. तो वार्षिक ३५-४० टक्क्यांपर्यंत पोहोचतो. यामागील कारणांमध्ये कामाच्या दीर्घ तासांमुळे येणारा थकवा, पगारवाढीचा अभाव आणि कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांचे ‘पोलिंग’ यांचा समावेश आहे. नजिकच्या काळात फायबर अभियंते, स्पिसर्स, फायबर टर्मिनेशन इक्विपमेंट टेक्निशियन, इन्स्टॉलेशन आणि रिपेअर, फॉल्ट रिझोल्यूशन टीम्स, फायबर सेलसाइट इंजिनीअर्स आणि फील्ड टेक्निशियन यांच्या नोकऱ्या वाढतील. भारतात डिजिटल आणि टेलिकॉम पायाभूत सुविधांच्या विस्तारामुळे फायबर तंत्रज्ञांसाठी नोकरीच्या संधी वाढतील. तथापि, उच्च उलाढाल आणि पगारवाढीच्या समस्यांमुळे कर्मचाऱ्यांना कायम ठेवणे हे आव्हान बनू शकते.

आजकाल

# कुपोषण- कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा

**तुषार गायकवाड**

‘कुठे नेवून ठेवला महाराष्ट्र माझा’ या घोषवाक्याखाली सन २०१४ च्या विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक भारतीय जनता पार्टीने सिंगल लार्जेस्ट पार्टी होत जिंकली. शिवसेनेला सोबत घेवून ५ वर्षे कारभार केला. या काळात उपमुख्यमंत्रीपद नव्हते.

फडणवीसांनी सन २०१४ ते २०१९ असा पूर्ण पाच वर्षांचा कालावधी मुख्यमंत्री म्हणून पाहीला. त्यानंतर सर्वात कमी कालावधीचे मुख्यमंत्री म्हणून २०१९ मध्ये ७९ तासांसाठी ते तत्कालीन राज्यपाल कोश्यारी कृपेने परत घटनाबाह्य पध्दतीने मुख्यमंत्री झाले. नोव्हेंबर २०१९ ते जुलै २०२२ पर्यंत ते विरोधी पक्षनेते होते. जुलै २०२२ पासून गृहमंत्री व उपमुख्यमंत्री तसेच महायुती सरकारमधील महत्वाचे घटक आहेत.

आज परत एकदा संपूर्ण बहुमताचे सरकार त्यांना चालवण्यासाठी मिळाले आहे. राजकीय विचारधारेचा विरोध वगळता, त्यांच्या चिकाटीला, मुत्सद्दीपणाला दाद दिली पाहीजे. तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होताहेत म्हणून शुभेच्छा दिल्या पाहिजेत.

पण त्याचबरोबर त्यांनी मुख्यमंत्री होताच, ज्या कामांना प्राथमिकता दिली पाहीजे अशी कामेही त्यांना सुचवणे नागरीक म्हणून आपले कर्तव्य आहे. कारभारी जरी जुनेच असले तरी, नवीन सरकारला पहिले ६ महिने काम करण्यासाठी वेळ दिला पाहीजे. महाराष्ट्राची ती परंपरा आहे, किमान आपण तरी जपली पाहीजे.

मग अशा वेळी ‘कुठे नेवून ठेवला महाराष्ट्र माझा’ या जाहीरातीची आठवण माझ्यासारख्याला का व्हावी? हा प्रश्न पडू शकतो. या भाजपच्या घोषवाक्याची आठवण झाली. त्याचे कारण गेल्या १० वर्षांतील ‘महाराष्ट्रातील बालकांची झालेली विदारक अवस्था’ आणि ‘महाराष्ट्राची बालकांच्या आरोग्याबाबतची नाचक्की!’



सन २००५-०६ मध्ये राज्यातील २ वर्षांखालील तीव्र कुपोषणग्रस्त मुलांची टक्केवारी ३९ टक्के इतकी लक्षणीय होती. तर अतीतीव्र कुपोषण ग्रस्त बालकांची संख्या १५ टक्के होती. बालकांच्या कुपोषणाचा हा टक्का कमी करण्यासाठी तब्बल ६ वर्षे गेली. २०१२ साली तीव्र कुपोषणग्रस्त मुलांची टक्केवारी २३ टक्के. तर अतीतीव्र कुपोषण ग्रस्त बालकांची संख्या ८ टक्के इतकी कमी झाली. अर्थातच हे श्रेय तत्कालीन राज्यकर्त्यांचे!

पण त्यानंतरच्या १० वर्षांतील आजची स्थिती काय सांगतेय?

तर कुपोषित मुलांच्या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असून लवकरच उत्तर प्रदेशला मागे टाकून प्रथम क्रमांकावर जावू शकतो. उत्तर प्रदेशात देशात सर्वाधिक ४८ टक्के बालके कुपोषित असून, महाराष्ट्रात हे प्रमाण ४७.७ टक्के आहे. सदरील आकडेवारी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्याच्या सर्वेक्षणातील असून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राज्यसभा खासदार मुकुल वासनिक यांनी राज्यसभेत उपस्थित केली आहे.

इतकेच नव्हे, तर जागतिक बँकेने भारतात केलेल्या सर्वेक्षणात देशातील ११ राज्यांत बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण अत्यंत वाढले असून यामध्ये महाराष्ट्राचा समावेश आहे. असे नमूद केले आहे. केंद्र सरकारच्या महिला व बालकल्याण मंत्रालयाने २०१८ मध्ये ॲनिमिया मुक्त भारत मोहीम सुरु केली. याअंतर्गत पोषण-२ योजना राबविली जाते. या योजनेतून सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षांसाठी महाराष्ट्राला ५,०५९ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे.

देशाच्या जीडीपीत सिंहाचा वाटा उचलणाऱ्या मुंबई शहरात ७२.८ टक्के मुले ॲनिमियाने ग्रस्त आहेत. कसली पुढची पिढी घडवतंय सरकार? आजच्या वृत्तपत्रांच्या मुखपृष्ठावर ‘महाराष्ट्र आता थांबणार नाही’ असे घोषवाक्य सरकारी खर्चाने लिहीले आहे. याचा अर्थ महाराष्ट्र आता उत्तर प्रदेशला बालकांच्या कुपोषणात मागे टाकल्याशिवाय थांबणार नाही असा घ्यायचा का? असा प्रश्न पडतोय.

राज्यातील भावी पिढी ‘४७.७ टक्के’ कुपोषणाने ग्रस्त असताना, राज्यकर्ते सरकारी खर्चाने जो आनंदोत्सवी रमणा घालत आहेत तो महाराष्ट्राच्या हिताचा नाही. यापेक्षा आपला महाराष्ट्र गेल्या १० वर्षांत कुठे नेवून ठेवलाय? हे डोळ्यावरील राजकीय झापडे काढून पाहणे आवश्यक आहे.

**साभार**

लोकसंसद

## देशातील नक्षलवादाचे समूळ उच्चाटन होणार

केंद्रीय गृह मंत्रालयाने संसदेत दिलेल्या माहितीप्रमाणे गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यासह देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त झाले आहेत. अजूनही देशात ११ राज्यांमधील ३८ जिल्हे नक्षल प्रभावित असून बहुसंख्य जिल्हे हे बिहार, झारखंड, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यातील आहेत. २०१० च्या तुलनेत २०२३ मध्ये नक्षल संबंधित हिंसक घटनांची संख्या ७३ टक्क्यांनी कमी झाली आहे. देशात २०१० मध्ये नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या १२६ होती. २०१८ मध्ये ती संख्या घटून ९० तर जुलै २०२१ मध्ये ७० झाली आणि एप्रिल २०२४ मध्ये ३८ जिल्ह्यांपर्यंत कमी झाली आहे. नक्षलवाद समस्येचे मुळासकट निराकरण करण्यासाठी २०१५ मध्ये ‘राष्ट्रीय धोरण आणि नक्षलवादाला संबोधित करण्यासाठी कृती योजना’ मंजूर करण्यात आली. त्यात सुरक्षा संबंधित उपाय, विकास योजना, स्थानिक समुदायांचे हक्क इत्यादींचा समावेश असलेले बहुआयामी धोरण आखण्यात आले. नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील विविध विकास योजनांसाठी गेल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात ४३५०.७८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या भागात १४५२१ किलोमीटरचे रस्ते, दूरसंचारसाठी ६५२४ टॉवर, ५७२१ पोस्ट कार्यालये, १००७ बँकेच्या शाखा आणि ९३७ एटीएम तसेच ४६ जिल्ह्यांत ४९ कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यात आली. परिणामी स्थानिकांना लाभलेल्या विकासाच्या नव्या संधी आणि रोजगारामुळे नक्षलवादाचे समूळ उच्चाटन होण्यास मदत होत आहे, ही अत्यंत जमेची बाजू आहे.

**-प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**९ डिसेंबर**

**१८७८ :-** ग्रंथकार, अण्णा आबाजी लट्टे यांचा जन्म. ‘कोल्हापूरच्या राज्याचा इतिहास’, ‘हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याचा उदय’, ‘शाहू महाराजांचे चरित्र’, ‘जगातील संघटित राजव्यवस्था’, ‘संस्थानचा इतिहास आणि माझ्या विलायतेच्या आठवणी’ अशी ग्रंथसंपदा. **१९०९ :-** संस्कृत, पाली भाषेचे अभ्यासक व्याख्याते, काव्यतीर्थ प्रा. नारायण वासुदेव तुंगार यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत ‘अशोकाचा राजधर्म’, ‘जातक मराठी भाषांतर’, ‘जातक संग्रह पाली धातू रुपावली’, ‘संस्कृत भाषा परिचय’ आणि ‘धंदे शिक्षण परिचय’ अशी साहित्य संपदा. **१९१४ :-** लेखक संत तुकाराम गंगाराम भुस्कुटे यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत ’सार्थ आनंदामृत’, ‘सार्थ आत्मप्रभाव’, ‘अंत्यसंस्कार व मुख्यविचार’, ‘आरोग्यसंजीवनी’, विचारधारा’ हे अध्यात्मिक ग्रंथ त्यांच्या नावावर आढळतात. **१९२६ :-** कवी रामचंद्र श्रीपाद गोसावी यांचा जन्म. यांच्या काव्यसंपदेत ‘अंतर्वेध’, ‘अंधारबन’, ‘डोळे’ आदींचा समावेश आहे. **१९३९ :-** गीतावाचस्पती गोपाळ भिडे यांचे निधन. वयाच्या ५ व्या वर्षी अंधत्व येऊनही त्यांनी उपनिषद रत्नप्रकाशचे भाषांतर केले. गीतेवर श्रीमद्भगवद्गीतार्थ रहस्यदीपिका हा ग्रंथ लिहिला. **१९४१ :-** रसायनशास्त्रविषयक लेखक लक्ष्मण गणेश साठे यांचे निधन. ‘रसायनशास्त्राची मूलतत्त्वे’, ‘राष्ट्रीय शिक्षणाचा ओनामा’, ‘रसायनशास्त्र प्रवेश’, ‘सृष्टिशक्तिशास्त्र’ इ. पुस्तके त्यांची प्रकाशित झाला. याशिवाय त्यांनी तयार केलेली ‘रासायनिक परिभाषा’ त्याकाळात १९१५ साली महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत प्रसिध्द झाली होती. प्रारंभी कालीन परिभाषाविषयक प्रयत्न म्हणून त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. **१९४५ :-** लेखक खुद-राम गोविंद पुरामकर यांचा जन्म, पेशाने अध्यापक असून यांचा ‘विश्वात्मक धर्म’ हा वैचारिक ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. **१९४७:-** नाटक, कथा, कविता तसेच वृत्तपत्रे, नियतकालिके यातून लेखन करणारे देवराज शिवाजी दुधलकर यांचा जन्म, ह्यांचा ‘काळोख’ हा ग्रामीण कथासंग्रह आणि ‘पतिता’ हा काव्यसंग्रह प्रसिद्ध. **१९६५ :-** टीकाकार, भाषाशास्त्रवेते प्रल्हाद थोडो कानेटकर यांचे निधन. ‘महाराष्ट्री भाषा’, ‘मराठी भाषेची जुनाट परंपरा’ हे त्यांचे महत्त्वपूर्ण लेख ‘रुक्मिणीहरण निरीक्षण’ या त्यांच्या ग्रंथात सामराजाच्या काव्याची चर्चा केली आहे. **१९६८:-** वारकरी संप्रदायाचे गुरुतुल्य अभ्यासक ह. भ. प. शंकर वामन तथा सोनोपंत दांडेकर, यांचे निधन. ज्ञानेश्वरी व वारकरी पंथावर अनेक ग्रंथ त्यांनी सिध्द केले. **१९७३ :-** कथा-कादंबरीकार डॉ. वामन दामोदर गाडगीळ यांचे निधन. ‘विचित्र संसार’, ‘चंपी आणि मोरया’ या कादंबऱ्या, ‘खुसखुशीत मेवा’, ‘मुलीच्या लग्नाच्या चटकदार कथा’ है कथासंग्रह. ‘मराठवाड्यातील गद्यविहार’ हे २३ लेखकांच्या गद्यांचे संपादनही त्यांनी केले. **१९७३ :-** जयवंत दळवी लिखित ‘संध्याछाया’ या नाटकाचा प्रथम प्रयोग धि गोवा हिंदू असोसिएशनतर्फे करण्यात आला. **१९७३:-** लेखक, चरित्रकार, समीक्षक प्रा. विठ्ठल हरी कुलकर्णी यांचे निधन. त्यांनी वृत्तपत्रे, नियतकालिकांतून विपूल प्रमाणात लेखन केले. तथापि, ‘व्यक्तिरेखा’ आणि ‘वि. ह. कुलकर्णी’ यांचे निवडक लेख’ ही दोन पुस्तके आणि ‘जॉर्ज बर्नार्ड शॉ’ व ‘अच्युत बळवंत कोल्हटकर : व्यक्ती आणि वाङ्मय’ हे दोन मोठे चरित्रग्रंथ एवढीच साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१९७८ :-** कवी किशोर नामदेवराव कवठे यांचा जन्म. ह्यांचा ’पसरत गेलेली शाई’ हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ डिसेंबर

१) श्री. पांडुरंग तुकाराम दळी
अलिबाग, ९-१२-१९३६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



डॉ. सौ अनिता संजीव शेटकर, वाढदिवस
अलिबाग

# मोकाट गुरांमुळे अपघाताचा धोका

## मालकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी



**। नागोठणे । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावर ठाण मांडून बसणारी मोकाट गुरे ही वाहन चालकांसाठी दिवसेंदिवस एक मोठी समस्या ठरत आहेत. या मोकाट गुरांची सर्वत्रच मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. ही गुरे सरळ सरळ रस्त्याच्या मधोमध बसत असल्याने वाहतुकीच्या समस्येंसह वाहन चालकांना व प्रवाशांना अपघाताला सामोरे जावे लागण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिसरातील शेतकऱ्यांच्या गुरांचा या मोकाट गुरांमध्ये मोठ्या प्रमाणात समावेश असल्यामुळे या मोकाट जनावरांच्या मालकांवर गुन्हे दाखल करा, अशी मागणी वाहनचालक व प्रवाशांमधून होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूकीसाठी महत्वाचे असे वाकण, सुकेळी, खांब, कोलाड नाक्यावर रस्त्यातच मोकाट गुरे ठाण मांडून बसलेली असतात. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. संबंधित गुरांच्या मालकांचा निष्काळजीपणा येथील प्रवाशीवर्गाच्या जीवाशी अक्षरशः खेळ सुरू असल्याने प्रवासी व वाहनचालक चांगलेच त्रस्त झाले आहेत. याच मोकाट गुरांच्या भर रस्त्यामध्येच एकमेकांशी झुंजी होत असतात. त्यामुळे दुचाकी वाहनांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच, रात्रीच्या वेळी रस्त्यावर उभी असलेली गुरे अंधारात दिसण्यात येत नसल्यामुळे वाहनांना अपघात होऊन अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे या मोकाट गुरांच्या बाबतीत काहीतरी ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे, अशी मागणी जोर धरत आहे.



## न्हाव्यातील पदयात्रा शिर्डीकडे रवाना

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोह्यातील साईदत्त सेवा संस्थानाचे यंदा न्हावे ते शिर्डी या पदयात्रेचे १८वे वर्ष आहे. दरवर्षी प्रमाणे दत्त जयंतीनिमित्त रवाना झालेली पदयात्रा १३ डिसेंबर रोजी शिर्डीत पोहचणार आहे. दरम्यान, ही पदयात्रा भजन व साईबाबांच्या गजरात न्हावे येथून प्रस्थान झाली आहे. या पदयात्रेला रोहा तसेच मुरुड तालुक्यातील १४० साईसेवक सहभागी झाले आहेत. पदयात्रेचे संस्थापक प्रमोद कासकर, अध्यक्ष साईली कासकर, मारुती सर्लेकर, विजयकुमार कासकर, परेश म्हात्रे, राहुल पोकळे, प्रदिप पोकळे, शशी डोलकर, राम पाटील, मनोज भायतांडेल, रामनाम भायतांडेल, सत्यप्रसाद आडाव, विलास कासकर यांच्या योग्य नियोजनातून पदयात्रा पुर्णतेला जात असते.

# उरण स्थानकातून मालवाहतुकीला सुरुवात

## स्थानिकांना रोजगाराची संधी



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरणच्या रेल्वे स्थानकातून प्रवासी वाहतूक सुरू झाल्यानंतर आता मालवाहतूकीलाही सुरुवात होणार आहे. स्थानकातुन काळ्या तेलाने भरलेली ५८ वॅगनची मालगाडी उत्तरप्रदेशकडे रवाना होणार आहे. त्यानंतर या रेल्वे स्थानकाववरुन लवकरच सिमेंटची देखील वाहतूक केली जाणार आहे.

उरण-नेरुळ मार्गावरुन जानेवारी २०२३ पासून प्रवासी वाहतूक सुरू करण्यात आली. त्यानंतर गुरुवारी (दि.५) काळ्या तेलाची मालगाडी सायंकाळी ४ वाजल्यापासून धावायला सुरुवात झाली. जेएनपीए बंदर आणि रासायनिक प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणावर काळे ऑईल काढले जाते. या काळ्या तेलाचा विविध कामांसाठी आणि वस्तू बनविण्यासाठी वापर केला जातो. त्यामुळे या काळ्या तेलाला देशभरातून मागणी असते. हे काळे तेल टँकरद्वारे पोहचवणे खार्चिक असते. त्यामुळे आता मालगाडीने पोहचवण्याची सुरुवात उरण स्थानकातुन करण्यात येणार आहे. रेल्वेने मालवाहतूकीमुळे वेळ व खर्चाची बचत होणार आहे.

त्यामुळे विविध कंपन्यांच्या शेकडो टँकरची उरण स्थानकात बुधवारी गर्दी झाली होती. या टँकरमधुन रेल्वे वॅगनमध्ये तेल पंपाने भरण्यात येत होते. या काळ्या तेलाने भरलेले टँकर उत्तरप्रदेशमध्ये पाठविण्यात येत असल्याची माहिती व्यावसायिक जितेंद्र घरत यांनी दिली आहे. या उरण रेल्वे स्थानकातुन मालवाहतुकीला प्रारंभ होत असल्याने स्थानिकांना विविध प्रकारचे रोजगार उपलब्ध होतील, असा दावा रेल्वे प्रशासनाकडून केला जात आहे.




## कोलाड येथे हिवाळी शिबीर संपन्न

**। खांब । वार्ताहर ।**

कोलाड येथील जीवनधारा संस्थेत ३ ते ५ डिसेंबर या कालावधीत हिवाळी शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे सागर दहिंबेकर व त्यांच्या सहकार्यांनी जंगलातील साप, पशुपक्षी व प्राणी यांबाबत माहिती सांगून आग लागल्यानंतर कशी विजवायची याचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले. शिबिराचा एक भाग म्हणून कामतवाडी खिंडीवाडी पहुरवाडी या वाड्यात तीन गट बनवून आदिवासीवाडीतील लोकांचे राहणीमान व जीवन कसे असते, याची अनुभूती देऊन वाडीतल्या मुलांसोबत विद्यार्थ्यांनी विविध कृती कार्यक्रम घेण्यात आले. येथील प्राथमिक शाळेला भेट देऊन कॅम्प फायर करण्यात आले. तसेच, स्नेहवर्धिनी संस्थेलाही भेट देण्यात आली.

## ऋतुजाला मास्टर्स पदवी प्रदान

**। पोलादपुर । वार्ताहर ।**



ऋतुजा राजेश मालुसरे हिने परदेशात उच्च शिक्षण घेत असताना इंग्लंड येथील न्यु कँसल युनिव्हर्सिटीत 'मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग अँन्ड डेव्हलपमेंट' या विषयात मास्टर्स ही पदवी प्राप्त केली आहे. युनिव्हर्सिटीमध्ये नुकत्याच पार पडलेल्या पदवीदान समारंभात डॅम ॲने जॉहन्सन यांनी पदवीपत्र सन्मानपूर्वक प्रदान केले. ऋतुजाचे शालेय शिक्षण मुंबईतील परेलच्या हॉली क्रास हायस्कूलमध्ये प्राथमिक शिक्षण, महर्षि दयानंद महाविद्यालयात बारावी सायन्स तर मनोहर फाळके आर्किटेक्ट महाविद्यालयात पदवी शिक्षण घेतले आहे.

## सुलोचना साळुंके यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील धानकान्हे येथील सुलोचना कुंडलिक साळुंके यांचे बुधवारी (दि.४) वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. त्या नाभिक समाजाचे जेष्ठ नेते व मा.अध्यक्ष सदानंद साळुंके यांच्या मातोश्री होय. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी शुक्रवारी (दि.१३) तर अंतिम धार्मिकविधी सोमवारी (दि.१६) पेण येथील गोळीबार मैदानात होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# पर्यावरणवादी माथेरानमध्ये घाणीचे साम्राज्य



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमधील काही भागातील नागरिकांची स्वच्छतेच्या बाबतीत मानसिकता नसल्यामुळे त्या-त्या भागात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे अभ्यासू व सुशिक्षित नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नगरपरिषदेमार्फत कचरा वेचक महिला कचरा संकलन करण्याचे काम नियमितपणे करीत असतात. परंतु, काही नागरिक जाणून-बुजून आपल्या जवळील ओला सुका कचरा गटारात फेकत असल्यामुळे त्या-त्या भागात दुर्गंधी पसरलेली असून घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे.

गावातील अनेक ठिकाणी घरगुती लॉजिंग पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत. लॉजिंगमधील प्लास्टिक बाटल्या तसेच अन्य कचरा नियमितपणे येणाऱ्या कचरा वेचक महिलांकडे न देता बाजूच्या गटारात टाकत असतात. यावर तोडगा काढण्यासाठी नगरपरिषदेने वस्तीच्या ठिकाणी जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे गरजेचे बनले आहे. त्यामुळे जो कोणी कचरा गटारात टाकेल त्यांच्यावर स्वच्छता विभागामार्फत दंडात्मक कारवाई करता येऊ शकते.

काही नागरिकांनी आपल्या घरातील शौचालयासाठी सेफ्टी टँक बांधलेले नसल्यामुळे शौचालयाचा पाईप थेट गटारात सोडल्याने सर्व घाण त्या गटारात पडत असते. त्यामुळे सफाई कामगारांना या दुर्गंधीमुळे स्वच्छता करणे खूपच कठीण बनलेले आहे.

## कर्जत येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर संपन्न

**। कर्जत । प्रतिनिधी ।**



घुमरे मित्र मंडळाच्यावतीने आर झुनझुनवला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलच्या सहकार्याने मोफत नेत्र चिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १२८ रुग्णांची तपासणी केली. त्यामध्ये मोतीबिंदू आढळलेल्या ४३ रुग्णांना हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आले. हे १४वे शिबीर असून ७५० पेक्षा जास्त रुग्णांची मोतीबिंदूच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

यावेळी छाया कुलकर्णी, दिनेश गणेगा, करण घुमरे, श्रीनिवास राव, कुमार गायकवाड, गणेश घेवारे, रविंद्र वैद्य, संजय कराळे, नंदकुमार बैलमारे, प्रशांत उगले, हरिश्चंद्र पाटील आदी उपस्थित होते.

## खारघर इस्कॉन मंदिरचे लोकार्पण


**। पनवेल । वार्ताहर ।**

इस्कॉन मंदिर ट्रस्टतर्फे खारघरमध्ये उभारण्यात आलेल्या इस्कॉन मंदिराचा लोकार्पण सोहळा कार्यक्रम ९ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान रंगणार आहे. इंटर नॅशनल सोसायटी फॉर कृष्णा कॉन्सियसन्स (इस्कॉन) एक जागतिक संस्था आहे. भारतासह जगभरात सुमारे ४०० पेक्षा अधिक इस्कॉन मंदिरे आहेत. इस्कॉन मंदिरातील अनुयायी जगभर भगवतगीता आणि हिंदू धर्म, संस्कृतीचा प्रचार करत असतात. २०१२ मध्ये खारघरमध्ये सेंट्रल पार्क शेजारी इस्कॉन मंदिराचे भूमिपुजन करण्यात आले होते. इस्कॉन मंदिर परिसरात दोन सहा मजली इमारतीचे बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहे. या ठिकाणी भक्ती वेदांत महाविद्यालयात भगवद गीता, भक्तीचे नऊ रस आदींचे अभ्यासक्रम आहेत. याशिवाय वाचकांसाठी देव-देवतांचे सर्व ग्रंथ या वाचनालयात असणार आहेत. या ठिकाणी पंचकर्म सारखे मोफत आयुर्वेदीक उपचार देण्यात येणार आहेत.

## पनवेलचा पाणीपुरवठा बंद

**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून पनवेल शहराला होणारा पाणीपुरवठा सोमवारी २४ तासांसाठी बंद राहणार असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे वपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे. पनवेल शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा सोमवारी (दि.९) सकाळी ९ ते मंगळवारी (दि.१०) सकाळी ९ वाजेपर्यंत बंद राहणार आहे. यादरम्यान सोमवारी हरिओम नगर, ठाणानाका, एचओसी, मार्केट यार्ड येथील जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा सुरु राहणार आहे. तर इतर ठिकाणी बंद राहणार आहे. तसेच, मंगळवारी गंगाराम सिनेमा, भाजी मार्केट, सर्व्हिस हौद, पटेल मोहल्ला येथील पाणीपुरवठा सुरु राहणार आहे. तर इतर ठिकाणी बंद राहणार आहे. तरी शहरातील नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## ट्रकची विजेच्या खांबाला धडक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत चारफाटा येथे बुधवारी (दि.४) रात्री निकिता इंटरप्राइजेस फर्मची हायवा गाडी तेथील विजेच्या खांबाला धडकला. त्यावेळी प्रचंड आवाजाचा स्फोट झाला आणि त्यानांतर आगीचा भडका उडाला. स्थानिकांनी त्या भागातील वाहतूक थांबवल्याने मोठा अनर्थ ठरला असून कर्जत नगरपरिषदेच्या अग्निशमन यंत्रणा तेथे पोहचल्याने अन्य धोका निर्माण झाला नाही.

निकिता इंटरप्राइजेस या फर्मचा टाटा कंपनीचा हायवा (एमएच-४६-एआर-३२५४) हा ट्रक कर्जत शहराच्या दिशेने जात होता. त्यावेळी चालकाच्या चुकीमुळे ट्रकचा लोफ्ट वरच राहिला. त्यामुळे त्या हायवा ट्रकचा लागलेली धडक हि रेल्वेकडे वीज वाहून नेणाऱ्या ११० केव्हीए क्षम तेच्या खांबालाच धडकला. यामुळे त्या वीज वाहिनीमधून निघालेल्या आगीमुळे ट्रकने अचानक पेट घेतला. त्यावेळी ट्रकच्या चालकाला विजेचा धक्का बसल्याने त्याने तात्काळ गाडीतून उडी मारत स्वतःचा जीव वाचवला. त्यावेळी त्या भागातून कर्जत नगरपरिषदेचे माजी नगरसेवक सोमनाथ ठोंबरे हे जात असताना त्यांनी चारफाटा येथील चारही रस्त्यावरील वाहतूक थांबवण्याचा प्रयत्न केला. यावेळी कर्जत नगरपरिषदेच्या अग्निशमन यंत्रणा पोहोचल्याने वेळेत आग आटोक्यात आली. यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

# मिनी ऊर्जा मेळाव्यात गौळवाडी विद्यालय सरस

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

टाटा पॉवर भिवपूरी व टाटा पॉवर खोपोली सायमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने मिनी उर्जा मेळावा आयोजित विज्ञान प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कर्जत तालुक्यातील गौळवाडी माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला असून ते दिल्ली येथे १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

खोपोली सायमाळ येथे टाटा पॉवर कंपनी मार्फत आयोजित 'ऊर्जा मेळावा २०२४' अंतर्गत राष्ट्रीय पातळवरील विज्ञान प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. याचा मुख्य उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान, गणित पर्यावरणाचे महत्व आदी कौशल्य व अभिरुची विद्यार्थ्यांत विकसीत करणे हा होता. त्याकरिता परिसरातील एकूण १४ शाळेंनी प्रवेश नोंदवला आणि २८ विज्ञान प्रतिकृतीचे सादरीकरण करण्यात आले होते. तसेच, प्रश्नमंजूषा, पोस्टर मेकिंग असे पुरक उपक्रम घेण्यात आले होते.

स्पर्धेकरिता इयत्ता सहावी ते नववीतील विदयार्थ्यांना प्रवेश देण्यात आले होते. प्रत्येक सहभागी शाळांनी कल्पकतने स्पर्धेत उत्तम तयारी दर्शवली होती. यामध्ये अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या गौळवाडी माध्यमिक विद्यालयाला घवघवीत यश मिळाले. विज्ञान पोस्टर मेकींग स्पर्धेत इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी नियती काजारी हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच, विज्ञानातील प्रतीकृती स्पर्धेत नववीत शिकणाऱ्या विद्यार्थीनी दिव्या तरे व श्रेया



बार्शी यांनी पर्यावरणस्नेही ऊर्जा स्त्रोत प्रकल्प सादर केला होतो. हा प्रकल्प स्पर्धचे लक्ष वेधून घेणारा ठरला. त्यामुळे या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला आहे. या प्रकाल्पाची निवड १७ डिसेंबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळवरीवल विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

ओएनजीसी उरण प्लांट पुरस्कृत, ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिती व कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१३) ओएनजीसी एपीयु मेन गेट येथे सकाळी ७ वजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरात मुंबई व नवी मुंबई मधील नामांकित रुग्णालयातील रक्तपेढ्यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. या कार्यक्रमाला डि.के. त्रिवेदी, संदीप कुमार चांद, भावना आठवले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

### दारू विक्रीमुळे महिलांचे संसार उद्ध्वस्त

# करंजाडेत दारूबंदीचा ठराव मंजूर

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत दारूबंदी लागू करण्यासाठीचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तसेच, मुख्य कार्यकारी अधिकारी अलिबाग, तहसीलदार पनवेल, गटविकास अधिकारी पनवेल यांना देखील त्याची प्रत देण्यात आली आहे.

करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत अनेक ठिकाणी दारू विक्री होत आहे. त्यामुळे येथील तरुण दारूच्या आहारी जाऊन नवजात पिढी व्यसनाधीन होत आहे. तसेच, गावातील दारू विक्रीमुळे बऱ्याचश्या महिलांचे संसार उध्वस्त झालेले आहेत. याबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रार अर्ज दाखल करण्यात आलेले आहेत.



करंजाडे वसाहतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ रस्त्याशेजारी वाईन शॉप असल्याने रस्त्यावर ये-जा करणाऱ्या महिलांना त्याचा त्रास होत आहे. तसेच, येथे थांबणाऱ्या वाहनांमुळे देखील वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे अपघात आणि चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहेत. तसेच, वाईन शॉपच्या शंभर मीटरच्या आत एक शाळा आहे. त्यामुळे येथील शाळेतील मुलांवर त्याचा दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> **करंजाडे शहराच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळच वाईन शॉप आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी देखील होते आणि महिलांना याचा त्रास होत आहे. संपूर्ण करंजाडेमध्ये दारूबंदी करण्यासाठी सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला आहे.**
>
> **- मंगेश शेलार, सरपंच, करंजाडे ग्रामपंचायत**

यावेळी कृषीवलशी बोलताना करंजाडे ग्रामपंचायतने ग्रामपंचायत हद्दीमध्ये दारूबंदी लागू करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर केला असल्याची माहिती सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे आणि सुदिन धनाजी पाटील यांनी दिली आहे.

**निवडक**

## तैलिक महासभेचा मेळावा

**सुतारवाडी :** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या पनवेल तालुका यांच्या वतीने रायगड जिल्हा संवाद मेळावा आयोजित केला आहे. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी पनवेल तालुक्यातील सर्व समाज बांधव पदाधिकारी विशेष मेहनत घेत आहेत तरी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन, संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे.

## मुकुंद गावंड यांची नियुक्ती

**उरण :** पिरकोन येथील रयत शिक्षण संस्थेचे, पंचरत्न इंग्लिश स्कूलच्या स्थानिक सल्लागार स्कूल कमिटीच्या सदस्यपदी पिरकोन गावातील मुकुंद गावंड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. आपण आपल्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शिक्षणप्रेमी व्यक्तिमत्त्व म्हणून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने कार्य करणार असल्याचा ठाम विश्वास मुकुंद गावंड यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केला.

## महेश निमणे यांचे ३६ वे रक्तदान

**पाताळगंगा :** रक्तदान सर्वांत श्रेष्ठ दान असे म्हटले जाते, रक्त आपण निर्माण करु शकत नाही. मात्र आपले रक्त देवून अनेकांचे प्राण वाचवू शकतो. हे उदिष्टे डोळ्यासमोर ठेवून महेश निमणे यांनी अडतीस वर्षामध्ये छत्तीस वेळा रक्तदान केले आहे. रक्तदान केले असल्यामुळे मनाला एक समाधान मिळते. आपल्या शरिरात पुन्हा रक्त ते निर्माण होत असते.मात्र कोणतीही व्यक्तीने मनात भिती न बाळगता रक्तदान करा असे आवाहन महेश निमणे यांनी केले आहे.

## बिनधास्त बारवर कारवाई

**नवीन पनवेल :** कोन येथील बिनधास्त बारवर पाच दिवसांची निलंबनाची कारवाई करण्यात आली. बारमध्ये नियम, अटी आणि शर्तींचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. पनवेल तालुक्यातील बिनधास्त बारवर यापूर्वी गुन्हे दाखल आहेत. त्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. त्यानुसार २९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबरपर्यंत पाच दिवसांसाठी बिनधास्त बारवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

## आरपीआयचे उपोषण

**नवीन पनवेल :** २४ वर्षीय तरुणीवर अत्याचार करणाऱ्या आरोपींना पोलिसांकडून अद्याप अटक करण्यात आली नाही. त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तर्फे पनवेल सहाय्यक पोलीस आयुक्तालयाजवळ आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे. २२ नोव्हेंबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तिघा जणांविरोधात बलात्कार आणि अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रायगडात क्षयरोग दूरीकरण मोहीम

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते पनवेलमध्ये उद्घाटन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे २०२५ पर्यंत टीबी मुक्त भारत करण्याचे स्वप्न आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी १०० दिवसांचा विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पनवेल हे मुंबईचे प्रवेशद्वार आहे. येथून नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर येजा होत असते. त्यामुळे येथील हॉटस्पॉट शोधून आपल्याला सातत्याने काम करावे लागणार आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.**

केंद्रीय क्षयरोग विभागाच्या सूचनेनुसार संपूर्ण भारतात आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार संपूर्ण रायगड जिल्ह्यात आज ७ डिसेंबर पासून पुढील १०० दिवसांच्या कालावधीत क्षयरोग दुरीकरण मोहिम: १०० दिवस राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन एमजीएम रूग्णालय पनवेल येथे जिल्हधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, एमजीएचे वैद्यकीय संचालक सुधीर कदम, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, जिल्हा क्षयरोग अधिकारी सचिन जाधव, पनवेल महानगरपालिका उपायुक्त डॉ.वैभव विधाते, पनवेल महानगरपालिका मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस.दळवी, एमजीएम विद्यापीठाचे शाखाप्रमुख डॉ.जी.एस नरशेट्टी, तहसिलदार विजय तळेकर, आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे आदि मान्यवर उपस्थित होते.



यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले, पनवेल महानगरपालिका ज्या पध्दतीने आरोग्य क्षेत्रात काम करते ते वाखणण्यासारखे असून अभिनंदनास पात्र आहे. आरोग्याच्या बाबतीत पनवेल स्वयंपूर्ण होण्याकरिता त्यांना संपूर्ण सहकार्य दिले जाईल. याबरोबरच या मोहिमेंतर्गत रायगड जिल्ह्यातील आदिवासी, कातकारी, कोळी बांधव, विटभट्ट्या अशा सर्व भागांतील सर्वेक्षण केले जाईल.

आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, पनवेल महानगरपालिकेच्यावतीने नागरी क्षेत्रात आरोग्य सेवेची शंभर टक्के काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. यासाठी जिल्हाधिकारी जावळे यांचे व एमजीएम रूग्णालयाचे नेहमीच पालिकेला सहकार्य मिळत असते. याचबरोबर येत्या काळात महापालिकेचे ४५० खाटांचे माताबाल संगोपन रूग्णालय तयार होणार यासाठी देखील सीएसआर फंडातून विविध कंपन्याचे सहकार्य आम्हाला मिळेल याची शाश्वती असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते टी बी रुग्णांना सकस व पोषक आहाराच्या फूड बास्केटचे वाटप करण्यात आले आहे.तसेच सीएसआर फंडातून मदत करणाऱ्या पिडीलाईट, महानगर गॅस, दिपक फर्टीलायझर, ओएनजीसी उरण, हिंदाल्को, जेएनपीए उरण अशा निक्षय मित्र यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सीएसआर फंडामधून देण्यात आलेल्या टीबी रुग्ण तपासणीसाठीच्या डिजिटल एक्सरे मोबाईल व्हॅनचे याचे यावेळी उद्घाटन करण्यात आले. तसेच यावेळी टीबी मुक्त जिल्हा करण्यासाठी शपथ घेण्यात आली.

जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सचिन जाधव यांनी प्रस्ताविकामध्ये कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. तसेच डॉ.पोतदार यांनी आभार व्यक्त केले.

# एसटीमधील खासगी बसेसचा प्रवाशांना त्रास



**। महाड । वार्ताहर ।**

महाराष्ट्र एसटी महामंडळाच्या माध्यमातून काही खासगी बसेसदेखील ठेकेदारी पद्धतीने सुरू आहेत. या बसेसवरील चालकांच्या मनमानी कारभारामुळे एसटी प्रवाशांचे अतोनात हाल होताना दिसत आहेत. यामुळे अनेक एसटी बसेसची आरक्षण सुविधा रद्द करण्याची पाळी महाड एसटी बस स्थानकावर आली आहे.

महाराष्ट्र एसटी महामंडळाने खाजगी तत्त्वावर काही गाड्या सुरू केल्या आहेत. या बसेस खाजगी प्रवासी वाहतूक ठेकेदार कंपनीकडून घेण्यात आल्या आहेत. या बसेसवरील चालकदेखील खाजगी तत्त्वावर नेमण्यात आले आहेत. एसटी आगारामधील लांब पल्ल्याचा प्रवास या खाजगी प्रवासी बसेस या खाजगी ठेकेदारांना अधिकतम देण्यात आलेल्या आहेत. केली काही दिवसांपासून या खाजगी बसेस वेळेत सुटत नसल्याने प्रवाशांचे हाल होताना दिसत आहे. खाजगी बसेस वरील चालक एसटी वेळापत्रकाच्या नियोजित वेळेत दाखल होत नसल्याने प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यातच अनेकवेळा चालक उपस्थित राहत नसल्याने ज्या प्रवाशांनी आपली जागा आरक्षित केलेली असते त्या प्रवाशांना ऐनवेळी दुसरी बस पाहण्याची वेळ येते. यामध्ये प्रवाशांचा वेळ आणि पैसा देखील वाया जात आहे. यामुळे महाड एसटी आगाराच्या अनेक बसेसचे आरक्षण सुविधा रद्द करण्यात आली आहे. याचा त्रास प्रवाशांना बसत असला तरी खाजगी ठेकेदारांचा वरिष्ठ पातळीवरील वरदहस्त असल्याने अधिकाऱ्यांना तोंडावर बोट ठेवण्याची पाळी येत आहे.

> **महाड एसटी आगारामध्ये जवळपास १७ खाजगी बसेस उपलब्ध आहेत. चालकांच्या बाबतीत यापूर्वी तक्रारी आल्या होत्या.त्यानुसार विभागीय वाहतूक अधिकाऱ्यांना कळविले आहे. काही बसेसचे आरक्षण रद्द करण्यात आले आहे**
>
> **– रितेश फुलपगार, आगार व्यवस्थापक महाड**

याबाबत प्रवाशांनी अनेक वेळा तक्रारी नोंदविल्या आहेत मात्र सदर बसेस पुरवठादार यांचा वरिष्ठ कार्यालयापासून वरदहस्त असल्याने स्थानिक पातळीवरील अधिकारी याबाबत पावले उचलताना हात आखडता घेत आहे. महाड एसटी आगारामध्ये जवळपास १७ बसेस या पद्धतीने कार्यरत आहेत. धुळे, जळगाव, पुणे, अक्कलकोट, बोरिवली, यांसह पनवेल अशा लांब पल्ल्याच्या बसेस खाजगी ठेकेदारांकडून चालवल्या जात आहेत. ४०० किलोमीटरचा प्रवास झाल्यानंतर या बसेसना ४७ रुपये प्रमाणे तर त्याबाहेर प्रवास झाल्यास ४४ रुपये दिले जातात. तर देण्यात येणाऱ्या डिझेलची रक्कम मात्र वजा केली जाते. महाड एसटी बसेस मधील बसेसचा सुमारे दीड ते दोन लाख किमीचा प्रवास होतो. याकरिता महाड एसटी आगाराकडून महिन्याला सुमारे ५० लाख रुपये या खाजगी बसेसना दिले जातात.

## मुरुड समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड पर्यटन क्षेत्र असल्याने पर्यटकांचे पाऊले आपोआप मुरुड पर्यटन क्षेत्र ठिकाणी येत असतात. शनिवारी -रविवारी शेकडो पर्यटक मुरुड समुद्रकिनारी येऊ लागली आहेत.यामुळे व्यवसाय तेजीत आहेत.

मुरुड समुद्रकिनारा हा मिनीगोवा म्हणुन ओळखला जातो. हा समुद्रकिनारा निळसर व स्वच्छ असुन येथील पांढऱ्या शुभ्र वाळुमुळे दिसणारे निळसर पाणी पर्यटकांना नेहमीच आकर्षित करीत असते. याठिकाणी देश-विदेशातून दरवर्षी लाखो पर्यटक ये-जा करित असतात. मुरुड शहरात पारा २१ अंश सेल्सिअस पोहोचला होता. यामुळे तापमान कमी झाले आणि हवा थंड वाहु लागल्या तरीही पर्यटकांनी स्वच्छ व सुंदर समुद्रात पोहण्याचा मनोसक्त आनंद घेतला तर कोणी वॉटर स्पोर्ट्स, घोडागाडी, बाईकवर आनंद घेतला.

काही पर्यटक ऐतिहासिक जंजिरा किल्ला, दत्तमंदिर, गारंबी धरण, अंबोली धरण, काशिद समुद्रकिनारी पाहण्यासाठी गर्दी केली होती. यामुळे घरगुती खानावळ, हॉटेल, टपरीधारक याठिकाणी जेवण्यासाठी पर्यटकांची गर्दी दिसून येत होती. समुद्रकिनारी असणारे लॉजिंग फुल झाल्याने पर्यटन व्यवसायिक आनंदीत दिसत आहेत.

## श्रीदत्त जयंती निमित्ताने विविध कार्यक्रम

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील मजगांव येथील ओम् श्रीदत्त देवस्थानतर्फे श्रीदत्त जयंती निमित्ताने दि.८ डिसेंबर ते दि.१५ डिसेंबर या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.


रविवारी उत्सवाला सुरुवात होत असून वीणा पूजन, श्रीगुरुचरित्र ग्रंथ पारायण, दत्त स्तुती, भजन, हरिपाठ, सोमवारी किर्तनकेसरी विकास देवडे, मंगळवारी रामणाचार्य गोपनीय पाटील आळंदी देवाची, बुधवारी बाळासाहेब शिंदे, गुरूवारी आवाजाचे जादुगार कवीराज झावरे, शुक्रवारी महिला किर्तनकार वाणीभूषण शिवचरित्रकार गीतांजली झेंडे, शनिवारी सुदाम पालवे, रविवारी सुदाम पालवे यांचे सुश्राव्य बहारदार किर्तन होणार आहे. १४ डिसेंबर रोजी श्रीदत्त मूर्तीला सार्वजनिक अभिषेक, श्रीगुरुचरित्र ग्रंथ समाप्ती, भिक्षेची फेरी, श्रीदत्तजन्म किर्तन व १५ डिसेंबर रोजी विश्वसुख शांती यज्ञ, काल्याचे किर्तन,नाम सप्ताह समाप्ती, महाप्रसाद आणि पालखी सोहळा आयोजीत करण्यात आला असून सोहळ्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे

## सिद्धार्थ कांबळे याचे निधन

**पाली :** सुधागड तालुक्यातील कानसळ गावचा युवक सिद्धार्थ पिठू कांबळे यांचे मोटारसायकल अपघातात उपचारादरम्यान निधन झाले आहे. सिद्धार्थ कांबळे व त्याचा नातेवाईक मनोज क्षीरसागर आपल्या जवळील मोटारसायकल वरून कानसळ येथून खोपोलीच्या दिशेने जात असताना शेंबडी गावच्या हद्दीतील वळणावर त्यांचा अपघात झाला. या अपघातात दोघांच्याही डोक्याला जबर मार लागल्याने त्यांना कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले. सिद्धार्थ कांबळे याची उपचारादरम्यान प्राणज्योत मावळली.

## सातउघडी पूल देतोय अपघाताला निमंत्रण

**। बोर्ली पंचतन । वार्ताहर ।**



श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगरला जोडणाऱ्या सातउघडी छोट्या पुलावरील एका बाजूचा लोखंडी कठडा मागील अनेक दिवसांपासून तुटलेला असून यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे.

या मार्गावर स्थानिकांच्या लहान मोठ्या वाहनांबरोबरच पर्यटनासाठी येणाऱ्या वाहनांची संख्या शनिवार,रविवार व सुट्टीच्या दिवशी मोठी असते.रात्रीच्या अंधारात अंदाज न आल्यास वाहन थेट पुलाखालील उधाणाच्या पाण्यात पडून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अपघाताला निमंत्रण देणाऱ्या या पुलाच्या कठड्याचे त्याचबरोबर या मार्गाची झालेली दुरवस्था यावर संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन काम मार्गी लावावे अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे** N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून** ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९
- **डिझेल रिट्स गाडी विकणे आहे** मॉडेल-२०११ एस ई किट पूर्ण नवीन अॅव्हरेज २१ ते २२ कि.मी. टायर बॅटरी नवीन विमा पॉलिसी मे २०२५ पर्यंत किंमत रू. २.०० लाख No-Agent Syteam मो.९९२१६४४१४४
- **अलिबाग येथील गिरीष इंटरप्रायसेस** करिता साईट वर काम करण्याकरिता १८ ते ३० वर्ष वयोगटातील मुलांची आवश्यकता आहे..... शिक्षणाची अट नाही... संपर्क : ८२३७३१६२१८
- **नोकरी! नोकरी !! नोकरी!!!** * नवोदित पाहिजेत..* केवळ पुरुष उमेदवार, शिक्षण -१२वी, पदवीधर, द्वी पदवीधर . पगार - ₹१०,०००/- ते १२०००/- पर्यंत. (योग्यतेनुसार) कामकाज कालावधी - दिवस पाळी ८ तास. ठिकाण - अलिबाग, चेंढरे. ९८२२०९५८०३.
- **अलिबाग-रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे** पाहिजेत. Re-ception-House Keeping-Waiter-Helper-Cook-etc. Phone: 8208459424 9323152990. Email: csskshirishkar@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## चाणजे येथे राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचे उद्घाटन

**। उरण । वार्ताहर ।**

पांडुरंग सांगू पाटील माध्यमिक महाविद्यालय उरण या शाळेमध्ये राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेची कार्यक्रमाची सुरुवात मोठ्या दिमाखात तालुक्यातील नामांकित बालरोग तज्ञ डॉ. विकास मोरे आणि डॉ. अजय कोळी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. विद्यार्थ्यांना जंतनाशक मोहीम याबद्दल दिलेले मार्गदर्शन फारच मोलाचे होते. या प्रसंगी मार्गदर्शक म्हणून लाभलेले दोनही बालरोग तज्ञ यांनी विद्यार्थी व सभागृहाला जंतनाशक मोहिमेबद्दल मार्गदर्शन केले.



लहान मुलांचा शैक्षणिक विकास होण्याबरोबरच शारीरिक विकास होणेही महत्त्वाचे असते. कृमीदोष बालकांना शारीरिकदृष्ट्या कमकुवत करतो. याचा थेट दुष्परिणाम बालकांच्या शारीरिक व वैयक्तिक विकासावर होतो. वैयक्तिक व आजूबाजूच्या परिसरातील अस्वच्छतेमुळे तसेच दूषित मातीच्या संपर्कात आल्यामुळे कृमीदोषांचा संसर्ग होत असल्याचे दिसून येते. कृमीदोष हे कुपोषण व रक्तक्षयाचे कारण असल्यामुळे कृमीदोष आढळणारी मुले ही नेहमी अशक्त व थकलेली असतात तसेच यामुळे बालकांची शारीरिक व बौद्धिक वाढही खुंटते. त्यामुळे त्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे कठीण जाते, असे डॉ. विकास मोरे म्हणाले.

बालकांमध्ये आढळणाऱ्या कृमीदोषाचे गांभीर्य लक्षात घेता तो समूळ नष्ट करण्यासाठी शासनाने विविध उपक्रम राबवले आहेत. शाळेत जाणाऱ्या व शाळेत न जाणाऱ्या सर्व मुला-मुलींना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देणे हा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले होऊन पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. याबद्दल डॉ. अजय कोळी यांनी मार्गदर्शन केले.

तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर राजेंद्र इटकरे यांनी या जंतनाशक मोहिमेचे तालुक्यातील १ ते १९ वर्ष वयोगटातील ३३२७३ बालकांना जंतनाशक गोळी देण्याचे येणार असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. विकास मोरे, डॉ. अजय कोळी बालरोगतज्ञ उरण, डॉ. बाबासो काळेल, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कविता भगत,वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती म्हात्रे, राष्ट्रीय बाल स्वास्थ मिशन वैद्यकीय अधिकारी स्नेहा चव्हाण, शाळेचे मुख्याध्यापक अनिल निकम, डॉ. मयुरी गावडे, शरद घाडगे, रामदास दिसले, संजय पेडणेकर, आरोग्य सेवक आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### ग्रीन वर्कस् ट्रस्टने घेतला विद्यार्थ्यांसाठी पुढाकार

# फणसाड अभयारण्यात निसर्ग शिक्षण सहल

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

ग्रीन वर्कस् ट्रस्ट व स्टेट बॅक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र वनविभाग, ठाणे (वन्यजीव) यांनी पुढाकार घेऊन फणसाड वन्यजीव अभयारण्यात विद्यार्थ्यांना फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या समृद्ध जैवविविधतेची ओळख करून देणे, निसर्ग आणि त्याच्या संवर्धनाबद्दल सहानुभूती आणि जागृती निर्माण करणे, वन्यजीव संरक्षणाच्या महत्वाविषयी मुलांचे प्रबोधन म्हणून निसर्ग शिक्षण सहलीचे आयोजन करण्यात आले होते.



रायगड जिल्हा परिषद शाळाचे गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी यांच्या अनुमतीने तळेखार, नांदगाव शाळा क्रं १, मजगाव, चोरढे, वावे, वळके जीडीटी फ्यूचर स्कूल सुडकोली, माध्यमिक विद्यालय काशीद अशा ९ शाळांच्या ३०२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता

विद्यार्थ्यांना पक्षी, सस्तन प्राणी, सरपटणारे प्राणी, कीटक आणि उभयचर प्राणी यांसारख्या विविध वन्यजीव प्रजाती निरीक्षण करण्याची आणि अभयारण्याच्या पर्यावरणाचे महत्व जाणून घेण्याची संधी मिळाली. याव्यतिरिक्त, या सहलीमध्ये वन्यजीवांना भेडसावणाऱ्या धोक्यांचा आणि संवर्धनाच्या प्रयत्नांची महत्त्वपूर्ण भूमिका समाविष्ट करण्यात आली. आणि शिक्षण आनंददायी करण्यासाठी, शैक्षणिक मनोरंजक उपक्रम आणि अभयारण्यातील वनस्पती आणि प्राणी यांच्याशी संबंधित खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

वन्यजीव अभयारण्याच्या परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूच्या समृद्ध जैवविविधतेची ओळख करून देणे हा होता. या सहली, ग्रीन वर्कस् ट्रस्टच्या शाश्वत फणसाड या प्रकल्पातील इको-बीज या उपक्रमांतर्गत,प्रकल्प व्यवस्थापक शिवानी पुजारी आणि कृपा पाटील यांनी सांगितले.

ग्रीन वर्कस् ट्रस्टचे स्वयंसेवक दिपाली भोपळे, आकाश म्हैसधुणे, सोनम पाटील, मिनार साळवी, सर्वेश अभ्यंकर, अभिषेक माने, मानस बर्वे, रोहित वाघमारे, प्रगती वाघमारे, आदित्य सोमण, जान्हवी नाईक, सागर सातपुते आणि प्रथमेश मोकल यांनी निसर्ग मार्गाचे नेतृत्व केले. यावेळी महाराष्ट्र वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक मनोहर दिवेकर वन परिक्षेत्र अधिकारी, नारायण राठोड यांनी विद्यार्थ्यांना विनाशुल्क प्रवेशाची परवानगी दिली.

# मातीचे संवर्धन होणे आवश्यक

## डॉ. रवींद्र मर्दाने यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**आपल्या परिसरातील जैवविविधता टिकवून ठेवण्यात माती परीक्षण महत्त्वाचे आणि मोलाचा वाटा असतो. अन्न, वस्त्र, निवारा, औषधी या जीवनाच्या चार प्रमुख साधनांचा स्त्रोतही माती असल्याने मातीचे संगोपन आणि संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी येथे केले. कर्जत येथील कृषी विद्यापीठाच्या प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात आयोजित दहाव्या जागतिक मृदा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी सहयोगी संशोधन संचालक डॉ. पुष्पा पाटील होत्या.**



डॉ. मर्दाने यांनी आपलय भाषणात थायलँडचे राजे भूमीबोल अदुल्यादेज यांचा ५ डिसेंबर हा जन्मदिन 'जागतिक मृदा दिन' म्हणून साजरा करण्याचे संयुक्त राष्ट्र महासभेने जाहीर केले आहे. या दिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे त्यांनी नेटके विवेचन केले. 'मातीची काळजी : मापन निरीक्षण व व्यवस्थापन' हे यावर्षीच्या उत्सवाचे घोषवाक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. भारताच्या ३२८.७३ दशलक्ष हेक्टर जमिनीच्या क्षेत्रफळापैकी १२०.४० दशलक्ष हेक्टर जमीन नापीक होत आहे. तर, पाणी आणि वाऱ्यामुळे दरवर्षी देशातील ५.३ अब्ज टन सुपीक मातीची धूप होऊन ती नष्ट होत चालली आहे. महाराष्ट्राच्या ३.०७ दशलक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्रफळापैकी ४२.५० टक्के जमीन खराब आहे. १५९ लाख हेक्टर जमीन दुष्काळाच्या छायेत आहे. तसेच १४६ लाख हेक्टर क्षेत्रफळावर माती आणि पाणी संवर्धनाची नितांत गरज आहे.

दरम्यान, पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी राब भाजणीऐवजी पर्यायी गादी वाफे पद्धतीचा अवलंब करण्यास शेतकऱ्यांना उद्युक्त करण्याची गरज असल्याचे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. पुष्पा पाटील व उपस्थितांनी भूमीबोल अदुल्यादेज यांच्या प्रतिमेचे पूजन केले. जीव रसायन शास्त्रज्ञ डॉ. तुषार बेडसे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. महेंद्र गवई, डॉ. मीनाक्षी केळुसकर, डॉ. वैशाली सावंत, डॉ. राजू सावळे व अन्य अधिकारी उपस्थित होते.



# बेलघर येथे जागतिक मृदा दिन साजरा

**। तळा । वार्ताहर ।**
तळा तालुक्यातील बेलघर येथे कृषी विभागामार्फत जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला. शेतकऱ्यांसाठी दिवसेंदिवस मातीचे बिघडत चाललेले आरोग्य तसेच माती संवर्धन काळाची गरज याबाबत जाणीव जागृती होण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी श्रीम. एम.एन. नागुरे (कृषी सहाय्यक) यांनी शेतकऱ्यांना मृदेचे महत्त्व पटवून देतानाच सेंद्रिय शेतीबद्दल माहिती सांगितली. तसेच तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे यांनी माती परीक्षण का गरजेचे आहे, याबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली. माती नमुना रिपोर्ट कसे वाचावे याबद्दल सविस्तर सांगतानाच पिकांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत अन्नद्रव्याबाबत माहिती दिली तसेच अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे झाडांच्या पानावर कोणत्या प्रकारची लक्षणे आढळून येतात याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी बेलघर सरपंच प्रवीण अंबार्ले, ग्रा. पं. सदस्य अजय सावंत, कृषी सहाय्यक संदीप साळुंके, अतुल बाबर, दिनेश चांदोरकर, योगेश कोळी व बेलघर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामस्थांपुढे जेएसडब्ल्यू प्रशासन नरमले

## स्थानिक तरुणांना नोकरीत प्राधान्य देण्याचे आश्वासन

**। गडब । वार्ताहर ।**
जेएसडब्ल्यू कंपनीत काराव ग्रामपंचायत हद्दीतील सुक्षिशिक्षित तरुण बांधवांना नोकरीत सामावून घ्यावे मागणीसाठी काराव ग्रामपंचायतीचे सदस्य दिनेश म्हात्रे, सदस्या भागश्री कडु, मुक्ता वाघमारे यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय पेण येथे लाक्षणिक उपोषण केले. यावेळी ग्रामपंचायतीचे सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील डिप्लोमा डिग्री व आय.टी. आय. पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता काढलेल्या नोकरभर्ती संदर्भात ग्रुप ग्रामपंचायत काराव व जे.एस.डब्ल्यू. अस्थापन यांच्यामध्ये चर्चेनुसार ग्रुप ग्रामपंचायत काराव हद्दीतील ज्या डिप्लोमा, डिग्री, आय.टी.आय.धारक विद्यार्थ्यांनी जे.एस.डब्ल्यू. कंपनीच्या लिंकवर ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेले आहे, अशा विद्यार्थ्यांची यादी सादर केलेली आहे, त्याविषयी आपल्यासोबत वारंवार चर्चा केलेली आहे, आपण प्रत्येकवेळी वेगवेगळी कारणे देऊन टाळाटाळ केली, व वेळ मारून नेत होते.दरम्यान, जे.एस.डब्ल्यू, प्रशासनाने ग्रुप ग्रामपंचायत काराव हद्दीतील डिप्लोमा, डिग्री, आय.टी. आय.धारक विद्यार्थ्यांना लवकरात लवकर नोकरीत समाविष्ट करावे, असे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना दिले.

त्यानंतर उपविभागिय अधिकारी प्रविण पवार यांनी जेएसडब्ल्यू कंपनीच्या अधिकारी बलवंत जोग व अन्य अधिकाऱ्यांना बोलवून घेऊन उपोषणकर्ते व कंपनीचे अधिकारी यांच्यामध्ये चर्चा घडवून आणली. झालेल्या चर्चेत काराव ग्रामपंचायतीमधील आयटीआय, इंजिनियर्स ला भरती प्रक्रिया मध्ये प्राधान्य देण्यात येईल असे आश्वासन कंपनीच्या अधिकाऱ्यांनी काराव ग्रामस्थांना दिले. यावेळी ग्रा.पं.काराव सदस्य दिनेश म्हात्रे, मुक्ता वाघमारे, भाग्यश्री कडू, आंदोलन मार्गदर्शक अरुण शिवकर, ग्रामपंचायतीच्या सरपंच माणसी पाटील, ग्रामपंचायत सदस्य पंचायतीमधील ग्रामस्थ, आदिवासी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# ऑनलाईन मोजणी संकेतस्थळाच्या समस्या

## शेतकरी, नागरिक हवालदिल

**। रसायनी । वार्ताहर ।**
शासनाच्या जमीन मोजणी कार्यालयान मोजणीचा सर्व कारभार ऑनलाइन पद्धतीने सुरु केला असून, त्यासाठी सर्वच प्रकारच्या मोजणीसाठी अर्ज भरावे लागत आहेत. प्रथमदर्शनी चांगली वाटणारी ही योजना आता शेतकरी तसेच नागरिकांना तापदायक आणि खर्चिक भासू लागली आहे.

या ऑनलाइन मोजणी संकेतस्थळाला आता कर्मचारीदेखील कंटाळू लागले आहेत. बऱ्याचदा हे संकेतस्थळ बंद असते अथवा अडकून राहते, त्यामुळे नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या संकेतस्थळावर मोजणी अर्ज भरताना एवढी किचकट प्रक्रिया ठेवलेली आहे, जेणेकरून सामान्य नागरिकांना अथवा गरीब शेतकऱ्यांना ती भरताच येत नाही. तसेच यामध्ये अर्ज भरताना शासनाने साधी मोजणी, तातडी मोजणी, अति तातडी मोजणी असे तातडीच्या मोजणीचेच तीन प्रकार केल्याने शेतकरी व सामान्य नागरिकांना नाहक जास्तीचे मोजणी आकारणी शुल्क भरावे लागत आहे, जे कधी एकरी बारा हजार रुपये देखील येते, त्यामुळे हा नाहकचा भुर्दंड नागरिकांना सहन करावा लागत आहे.

पूर्वी तातडी आणि अति तातडी असे दोनच प्रकार असताना अति अति तातडी प्रकार का आण्यात आला, हा संशोधनाचा विषय आहे. जे खातेदार अति अति तातडीचे शुल्क भरतात त्यांना लगेचच मोजणी तारीख मिळते, परंतु गरीब शेतकऱ्यांना मात्र चार महिन्यांनंतर मोजणीची तारीख मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरत आहे.

यावर कडी म्हणजे ऑनलाइन फॉर्म भरणारे शेतकऱ्यांकडून एक हजार ते दीड हजार रुपये उकळत असल्याने शेतकऱ्यांना तोंड दाबून बुक्क्याने मार सहन करावा लागत आहे. शासकीय यंत्रणेने या समस्येतून नागरिकांची सोडवणूक करावी, अशी मागणी आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## 'रस्त्याची सफाई तात्काळ करावी'

**चौल :** अलिबाग तालुक्यातील वरंडे-देवघर रस्त्याच्या दुतर्फा झाडीझुडुपे वाढली असून, रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे समोरासमोर दोन मोठी वाहने आल्यास अडथळा निर्माण होत आहे. तसेच अनेकदा समोरुन येणारे वाहन दिसून येत नाही. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. चौल-भोवाळे येथील यात्रा पुढील आठवड्यापासून सुरु होत असून, याच मार्गावरुन मोठी वाहने जातात. त्यामुळे संबंधित विभागाने या रस्त्याची तात्काळ साफसफाई करावी, अशी मागणी होत आहे.

# मोफत नेत्रचिकीत्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**। नागोठणे । वार्ताहर ।**
लायन्स क्लब नागोठणेतर्फे तसेच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या सहकार्याने व दानशूर व्यक्तिमत्व हभप विजय शहासने यांच्या सौजन्याने त्यांच्या मातोश्री कै. मंदाकिनी महादेव शहासने यांच्या स्मरणार्थ बुधवार, दि. ४ डिसेंबर रोजी मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागातील नेते भाई टके यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ५८ नागरिकांची नेत्र चिकित्सा करण्यात आली. यामध्ये २६ मोतिबिंदू रुग्ण आढळले. त्या सर्वांना पनवेल येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले असल्याची माहिती एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी दिली. दरम्यान, यावेळी नेत्रचिकित्सा शिबिराबाबत लायन्स क्लबचे सचिव डॉ. अनिल गीते यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

या शिहअरात राष्ट्रवादीचे नेते भाई टके, नागोठणेचे माजी सरपंच ला. विलास चौलकर, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया काकडे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, ऐनघरचे माजी सरपंच रमेश झोलगे, प्रसिद्ध व्यापारी तथा कै. मंदाकिनी शहासने यांचे ज्येष्ठ सुपुत्र दिलीप शहासने, अरुणा शहासने, विजय शहासने, अनुराधा शहासने, कुलदीप शहासने, हरेश शहासने, शांताराम शहासने, प्रकाश झेमसे, उल्हास शिंदे, बिपीन सोष्टे, सिद्धेश काळे, रतन हेंडे, लायन्स क्लब अध्यक्ष सुनिल कुथे, उपाध्यक्ष संतोष शहासने, एमजेएफ ला. विवेक सुभेकर, सचिव डॉ. अनिल गीते, घिसूशेठ जैन, सुधाकर जवके, सुजाता जवके, दिपक गायकवाड, यशवंत चित्रे, जयराम पवार, सखाराम ताडकर, विशाल शिंदे, डॉ. साधना झोलगे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, मोफत मोतिबिंदू शिबीर लायन्स क्लब नागोठणेतर्फे दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी घेण्यात येते, तसेच या शिबिराबाबत अधिक माहितीसाठी ९२७०४९९११३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन ला. विवेक सुभेकर यांनी केले आहे.

# बेकायदेशीर पार्किंगमुळे पादचाऱ्यांचे हाल

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**
पाली शहरात बेकायदेशीर वाहन पार्किंगमुळे पादचारी व शाळकरी विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पाली नगरपंचायत व पोलीस प्रशासन अपघाताची वाट पाहात आहे का? अनेक वेळा तक्रार देऊनदेखील उपाययोजना मात्र शून्य आहे. नगरपंचायत व पोलीस प्रशासन या अवैध पार्किंगवर कारवाई करणार याकडे पालीकरांचे लक्ष लागले आहे.



पाली शहरातील मुख्य रस्त्यांवर आणि शाळांच्या परिसरात बेकायदेशीर वाहन पार्किंगमुळे पादचारी आणि शाळकरी विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांवर वाहनांची गर्दी वाढल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या असल्या तरी प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही.

बेकायदेशीर पार्किंगमुळे रस्त्यांवर चालणे कठीण झाले आहे. शाळकरी विद्यार्थी आणि पादचारी यांना रस्त्यांवरून चालताना जीव मुठीत धरून चालावे लागते. यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी प्रशासनाला वारंवार विनंती केली आहे की, या समस्येवर त्वरित उपाययोजना करावी, परंतु अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, उप मुख्य अभियंता (कार्य), रत्नागिरी, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून IREPS पोर्टलवर ई-निविदाद्वारे सिंगल पैकेट बिड प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहेत.

**अनु. क्र. 1: कामाचे नाव:** एसएसई/वर्क्स/रत्नागिरी विभागांतर्गत रत्नागिरी स्टेशनवर टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. **निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू- वॉटर-2024-19 **दिनांक:** 09/12/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹:20,04,552.36/- (जीएसटी वगळून).

**अनु. क्र. 2: कामाचे नाव:** एसएसई/वर्क्स/माणगाव विभागांतर्गत कर्मचारी निवासस्थानांसह कोलाड, माणगाव आणि वीर स्टेशन्ससाठी टँकरद्वारे पिण्याच्या पाणीपुरवठा. **निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-वॉटर-2024-18 **दिनांक:** 09/12/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 14,94,450/- (जीएसटी वगळून).

**निविदेसाठी वरील सर्व समान: बोली सुरू होण्याची तारीख:** 16/12/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख / वेळ:** 30/12/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 5 महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/ सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in वेबसाइटला भेट द्या. शुद्धिपत्र/ परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. सुवर्णा रविंद्र पाटील यांनी मौजे नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री. केतन कृष्णा सुरोशी<br>श्री. कृष्णा दत्तू सुरोशी | २१ | ५/अ | ०-४०-०० | ०-३२ |
| | (जुना महसुल गाव साळोख त. वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं ४८/५/अ) | | | |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दि. ०९/१२/२०२४
**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.- ९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९८५०७६७५६८

## जाहीर नोटीस

माझे अशिल प्रगती गणपत जैस्वार यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. उदय काशिनाथ चव्हाण यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे साळोख तर्फे नीड आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड | १७/२/अ | ०.२८.३० | ४.९७ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ०९/१२/२०२४

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

दिनांक : ०९ डिसेंबर, २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे. आर. पॉ. | रुपये | पैसे |
| चंद्रकांत शंकर मराडे | २७ | १/अ | ०-१३-५० | ० | ६९ |
| | ३७ | ४/ब | ०-३०-०० | ३ | २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. २, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

सही/-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :-०९/१२/२०२४
मो. नं. ९३७२९६४६६५

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला काळा घोडा, फोर्ट, मुंबई-०३२

क्र. अपील/डेस्क १/आरटीएस/रिव्ही/२३७/२०२४ दिनांक : ०३.१२.२०२४

जाहिर सूचना

प्रति
१. श्रीमती सुलोचना मारुती अधिकारी
२. श्री संतोष मारुती अधिकारी
दोघे रा. म. काकडे टेरेस, एफ विंग, रुम नं. १०
वारजे माळवाडी, पुणे, जि. पुणे. ४११०५८
३. श्री राजेश मारुती अधिकारी
४. श्रीमती सुरेखा मारुती अधिकारी
दोघे रा. मु. एल-३९, रुम नं. ६०२. महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे, जि. पुणे-६
५. श्रीमती वंदना सुभाष शिंदे
रा. मु. ससाणे नगर, गणेश पार्क, बी-४, हडपसर, पुणे. जि. पुणे-६
६. श्रीमती उषा हरीश्चंद्र धनवी
रा. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड
(अर्जदार क्र. २ स्वत: करीता व अर्जदार क्र. १ व ३ ते ६ यांचे अखत्यारी म्हणून) **अर्जदार**

विरूध्द
१. श्री राम रघुनाथ अधिकारी
रा. इंदापूर, ता. माणगांव, जि. रायगड
२. श्रीती संगिता दत्तात्रय देसाई
मु. वसंत अपार्टमेंट, रुम नं. ११, महाड, ता. महाड, जि. रायगड
३. श्रीमती वैशाली विश्वनाथ पार्टे
रा. मु. खांब, ता. रोहा, जि. रायगड
४. लक्ष्मण रघुनाथ अधिकारी मयत तर्फे वारस
४.१ श्रीमती गिता लक्ष्मण अधिकारी
४.२ श्री योगेश लक्ष्मण अधिकारी
क्र. ४.१. ते ४.२. रा. मु. बिल्डींग नं. २००, रुम नं. १०-१२, लॉट्रक्स मित्र मंडळाजवळ, गणपती मंदीराजवळ, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे, जि. पुणे
५ श्रीमती तारामती हरीश्चंद्र देशमुख
रा. मु. आडोशी. पा. सांजगाव, ता. खालापूर, जि. रायगड
६ श्रीमती संगिता रघुनाथ अधिकारी
रा. भाजी मार्केट, महाड, ता. महाड, जि. रायगड
७ केशव लक्ष्मण अधिकारी मयत तर्फे वारस
७.१ श्रीमती वत्सला केशव अधिकारी
७.२ श्री. शाम केशव अधिकारी
७.३ श्री. अजय केशव अधिकारी
क्र. ७.१ ते ७.३ रा. मु. साईनगर, इंदापूर, तळाशेत. ता. माणगाव, जि. रायगड
८. श्रीमती शालिनी दत्तात्रय अधिकारी
९. श्री. रविंद्र दत्तात्रय अधिकारी
क्र. ८ व ९ रा. मु. इंदापूर, ता. माणगाव, जि. रायगड
१०. श्रीमती शैला मोहन देशमुख
११. श्रीमती अलका मंगेश देशमुख
रा. मु. नांगलवाडी फाटा, बिरवाडी, ता. महाड, जि. रायगड.. **सामनेवाले**

**विषय :- अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद अपिल क्र. ५८/२०२१ दि. ०१.०१.२०२४ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज.**

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल/फेरतपासणी अर्जाची सुनावणी (प्राथमिकतेच्या मुद्यावर) मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय. १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १८.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास अपिल/फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
नायब तहसिलदार (अपिले)
अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता

# भारतीय संघाचा लाजिरवाणा पराभव

## बांगलादेश संघाकडून ५९ धवांनी पराभूत

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशच्या १९ वर्षांखालील संघाने रविवारी (दि.८) मोठा पराक्रम केला आहे. बांगलादेशने १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत अंतिम सामन्यात भारतीय संघाला ५९ धावांनी पराभूत केले आहे. यासह बांगलादेशने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. बांगलादेशने गेल्यावर्षी देखील अंतिम सामन्यात ८ वेळच्या विजेत्या भारतीय संघाला पराभूत करत १९ वर्षांखालील आशिया चषक जिंकला होता. अंतिम सामन्यात भारतीय संघासमोर बांगलादेशने १९९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला ३५.२ षटकात सर्वबाद १३९ धावाच करता आल्या. त्यामुळे भारतीय संघाला सलग दुसऱ्यांदा उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आहे.

भारताकडून दमदार फॉर्ममध्ये असलेल्या आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशी यांनी डावाची सुरुवात केली. परंतु, या दोघांनाही यावेळी मोठी खेळी करता आली नाही. आयुषला अवघ्या १ धावेवर अल फहादने त्रिफळाचीत केले. त्यानंतर वैभव सूर्यवंशीला ९ धावांवर मारुफ मृधाने बाद केले. पण त्यानंतर आंद्रे सिद्धार्थ आणि केपी कार्तिकेय यांनी डाव सावरल होता. पण त्यांची भागीदारी होत असतानाच आंद्रे सिद्धार्थला मोहम्मद रिझान होसैनने २० धावांवर त्रिफळाचीत केले. त्यानंतर कार्तिकेय आणि कर्णधार मोहम्मद अमन यांनी मिळून भारताचा डाव पुढे नेला. परंतु, २१ व्या षटकात भारताला दुहेरी धक्का बसला. इक्बाल हुसैन इमॉनने आधी कार्तिकेला २१ धावांवर आणि निखील कुमारला शून्यावर बाद केले.

हरवंश सिंगलाही २३व्या षटकात इमॉननेच ६ धावांवर बाद केले. त्यानंतर किरण चोरमळेलाही फार काही करता आले नाही. तो १ धावेवर बाद झाला. भारतीय संघ गडी गमावत असताना एक बाजू अमनने सांभाळली होती. पण त्यालाही ३२ व्या षटकात २६ धावांवर अझ्झुल हाकिम तमिमने बाद केले. त्यानंतर हार्दिक राज आणि चेतन शर्मा झुंज देत होते. पण हार्दिकही २४ धावांवर ३४ व्या षटकात तमिमकडूनच पायचीत झाला. अखेरीस चेतन शर्मालाही तमिमनेच १० धावांवर बाद केले आणि भारताचा डाव संपुष्टात आला. बांगलादेशकडून इक्बाल होसैन इमॉन आणि मोहम्मद अझिझुल हाकिम तमिम यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. तसेच, अल फहादने २ बळी घेतले, तर मारुफ मृदा आणि मोहम्मद रिझान होसैन यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

तत्पुर्वी बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना सर्वबाद १९८ धावा केल्या होत्या. बांगलादेशकडून मोहम्मद रिझान होसैनने सर्वाधिक ४७ धावा केल्या, तसेच मोगम्मद शिहाब जेम्सने ४० धावांची खेळी केली. फरीद हसन फायसले ३९ धावा केल्या, तर झवाद अब्रारने २० धावा केल्या. भारताकडून गोलंदाजी करताना युधजीत गुहा, चेतन शर्मा, हार्दिक राज यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. तसेच, किरण चोरमळे, केपी कार्तिकेय आणि आयुष म्हात्रे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.



# कांगारूकडून भारताचा दारूण पराभव

## गुणतालिकेत तिसऱ्या क्रमांकावर घसरण

**। ॲडलेड । वृत्तसंस्था ।**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफी या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने भारताविरुद्ध पहिल्या सामन्यातील पराभवानंतर दुसऱ्या सामन्यात दणक्यात पुनरागमन केले. ऑस्ट्रेलियाने ॲडलेडला झालेल्या दिवस-रात्र कसोटी सामन्यात अडीच दिवसातच भारताविरुद्ध १० गडी राखून विजय मिळवला आहे. यामुळे आता दोन सामन्यांनंतर या मालिकेत १-१ अशी बरोबरी झालेली आहे. यामुळे भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेतही तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. अव्वल




क्रमांकावर ऑस्ट्रेलिया पोहचला आहे, तर दक्षिण आफ्रिका दुसऱ्या क्रमांकावर आहे.

दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाला १९ धावांचेच लक्ष्य देता आले होते. हे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने ३.२ षटकातच पूर्ण केले. ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर नॅथन मॅकस्विनी (१०) आणि उस्मान ख्वाजा (९) नाबाद राहिले. या सामन्यात तिसऱ्या दिवशी भारताने २५व्या षटकापासून ५ बाद १२८ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली. परंतु, दिवसाच्या पहिल्याच षटकात ऋषभ पंतला मिचेल स्टार्कने २८ धावांवर बाद केले. त्यानंतर नितीश कुमार रेड्डी आणि आर अश्विनने डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. परंतु, अश्विनला पॅट कमिन्सने ७ धावांवर बाद केले. यानंतर हर्षित राणाने नितीश रेड्डीला साथ देताना १२ चेंडू खेळला. परंतु, त्याला ३४ व्या षटकात कमिन्सने बाद केले. पुढच्या षटकात नितीश रेड्डीलाही कमिन्सनेच नॅथन मॅकस्विनीच्या हातून झेलबाद करत ५ बळी पूर्ण केले. अखेरीस मोहम्मद सिराजला स्कॉट बोलंडने ७ धावांवर बाद करत भारताचा डाव ३६.५ षटकात १७५ धावांवर संपवला.

# ऑस्ट्रेलियन महिलांची भारतावर आघाडी

## २-0 ने मालिका घातली खिशात

**। ब्रिस्बेन । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला ऑस्ट्रेलिया महिला संघाविरुद्ध ब्रिस्बेनमध्ये एकदिवसीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यात १२२ धावांनी पराभूत झाल्या आहेत. यामुळे ऑस्ट्रेलिया महिला संघाने तीन सामन्यांची एकदिवसीय मालिकाही २-0 अशा विजयी आघाडीसह खिशात टाकली.

महिला एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलिया संघाने प्रथम फलंदाजी करताना ५0 षटकांत ८ बाद ७१ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाकडून एलिस पेरीने सर्वाधिक १0५ धावांची खेळी केली. तसेच, जॉर्जिया वॉलने १0१ धावा केल्या. या दोघींशिवाय फोबी लिचफिल्डने ६0 धावांची आणि बेथ मुनीने ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. यावेळी ऑस्ट्रेलिया संघाने भारतासमोर २७२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली होती. चौथ्याच षटकात स्मृती मानधना (९) हिची विकेट गमावली होती. त्यानंतर हर्लिन देवोल (१२) बाद झाली. यानंतर ऋचा घोष आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी डाव सावरताना अर्धशतकी भागीदारी केली. यादरम्यान ऋचा (५४) हिला ॲलना किंगने त्रिफळाचित केले. यानंतर हरमनप्रीत आणि जेमिमा रोड्रिग्स यांनी डाव पुढे नेला. परंतु, हरमनप्रीत (३८) हिला मेगन शटने माघारी धाडले.

यानंतर दीप्ती शर्मा (१0), जेमिमाह (४३), सायमा ठाकोर



(७), रेणुका सिंग ठाकोर (१) आणि प्रिया मिश्रा (५) या देखील बाद झाल्या. यावेळी मिन्नू मनीने (नाबाद ४६) चांगली झुंज दिली होती. परंतु, अखेर प्रिया पुनिया अनफिट असल्याने ती मैदानात फलंदाजीला आली नाही. त्यामुळे भारताचा डाव संपुष्टात आला.

## महिला प्रिमिअर लिगचा लिलाव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रिमिअर लीगच्या मेगा लिलावानंतर आता महिला प्रिमिअर लीगचीही तारीख व खेळाडूंची यादी जाहीर झाली आहे. डब्लूपीएलमधील ५ फ्रँचायझींनी ७ नोव्हेंबर रोजी संघात रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली होती. ५ फ्रँचायझींकडून एकूण ७१ खेळाडूंना संघात रिटेन करण्यात आले होते. महिला प्रिमिअर लीग २0२५ चा लिलाव बेंगळूरू येथे रविवारी (दि.१५) पार पडणार आहे. लिलाव दुपारी ३ वाजता सुरू होणार आहे. यावेळी एकूण १२0 खेळाडू लिलावात उतरले आहेत. ज्यामध्ये ९१ भारतीय व २९ परदेशी खेळाडूंचा समावेश आहे.

## न्यूझीलंडचा मायदेशात मोठा पराभव

**। वेलिंगटन । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडला मायदेशातील इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मलिकेतील दुसऱ्या सामन्यात तिसऱ्याच दिवशी ३२३ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. इंग्लंडने न्यूझीलंडविरुद्ध कसोटीत मिळवलेला हा धावांच्या तुलनेतील सर्वात मोठा विजय आहे. याशिवाय इंग्लंडने ३ सामन्यांची कसोटी मालिकाही २-0 अशी विजयी आघाडी घेत खिशात टाकली आहे.

या सामन्यात इंग्लंडने न्यूझीलंडसमोर ५८३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ दुसऱ्या डावात ५४.२ षटकात २५९ धावांवर संपुष्टात आला. न्यूझीलंडकडून दुसऱ्या डावात टॉम ब्लंडेलने १0२ चेंडूत ११५ धावांची शतकी खेळी केली होती. तसेच, नॅथन स्मिथने ४२ धावा केल्या. परंतु, बाकी कोणाला खास काही करता आले नाही. इंग्लंडकडून कर्णधार बेन स्टोक्सने सर्वाधिक ३ बळी घेतले. तत्पुर्वी इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात सर्वबाद २८0 धावा केल्या होत्या. त्याच्याकडून हॅरी ब्रुकने सर्वाधिक १२३ धावा केल्या होत्या, तर ऑली पोपने ६६ धावा केल्या. न्यूझीलंडकडून नॅथन स्मिथने ४ बळी घेतले होते.

# वरद टॉवर ठरला अव्वल




**। रसायनी । वार्ताहर ।**

खारघर येथे आई ग्रुप ओवे यांच्यातर्फे रायगड प्रिमीयर लिग नाईट क्रिकेट सामन्यांचे आयोजन अध्यक्ष कैलास म्हात्रे यांनी केले होते. या क्रिकेट स्पर्धांमध्ये रसायनी येथील वरद टॉवर रसायनी संघाने अंतिम स्पर्धेत बाजी मारून प्रथम क्रमांकाचे ५ लाख रूपयांचे पारितोषिक पटकावल आहे. रसायनीतील खेळाडूंचा भरणा असलेला वरद टॉवर हा संघ जिल्हास्तरावरच नाही तर राज्याबाहेरही आपला ठसा उमटवत आहे.

या संघात अनेक नावाजलेले खेळाडू आहेत. यातील रजत मुंढे याने तर ४ चारचाकी, १५ दुचाकी तसेच लाखो रुपयांची पारितोषिके जिंकली आहेत. रसायनीतील वरद टॉवर संघाने मुंबई, पुणे तसेच दिल्लीतील अनेक संघांना धुळ चारुन विजय संपादन केला आहे.




● उरण तालुक्यातील बोरी गावच्या मुग्धा प्रसाद उभारे या अवघ्या ७ वर्षीय चिमुरडीने महिंद्रा ज्युनियर रायझिंग स्टार २०२४ डान्स स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. या यशाबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महिंद्रा हॉलिडे आणि रिसॉर्ट इंडिया लिमिटेडतर्फे घेण्यात आलेली महिंद्रा ज्युनिअर रायझिंग स्टार डान्स स्पर्धा शनिवारी (दि.७) मुंबईत पार पडली.

# कुस्ती पंच, प्रशिक्षक शिबीर संपन्न



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथील कुस्ती पंच व प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराला कुस्तीप्रेमी व कुस्ती खेळाडूंच्या उपस्थितीने सुयोग्य प्रतिसाद लाभला. यावेळी जिल्हा व तालुकास्तरावर कुस्ती स्पर्धा वाढविणे व खेळाडूंच्या मार्गदर्शनावर भर देणे, हे पंच व प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनाचे उद्दीष्ट असल्याचे प्रतिपादन रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष जयेंद्र भगत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना केले आहे.

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथील जिल्हा कुस्ती प्रशिक्षण केंद्रात रविवारी (दि.८) कुस्ती पंच व प्रशिक्षक प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. यावेळी प्रमुख अतिथी जिल्हा कुस्तीगीर संघटना अध्यक्ष जयेंद्र भगत, जिल्हा व तालुकास्तरावरील कुस्तीगीर संघटनेचे पदाधिकारी उपाध्यक्ष भगवान धुळे, उपाध्यक्ष नंदु म्हात्रे, कार्याध्यक्ष सुभाष घासे, सरचिटणीस मारूती आडकर, खजिनदार गजानन हातमोंडे, सहचिटणीस प्रमोद भगत, हिरामण भोईर, राजाराम कुंभार, रविंद्र घासे, बळीराम पाटील, जयराम गवते, विलास पाटील, चंद्रकांत ठाकूर आदी मान्यवर उपस्थीत होते.

या कुस्ती शिबिरासाठी राष्ट्रीय कुस्ती पंच व रायगड जिल्हा कुस्ती प्रशिक्षक संदिप वांजणे यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रीत करण्यात आले होते. वांजणे यांनी उपस्थित कुस्ती खेळाडू, होतकरू पंच व प्रशिक्षक तसेच जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे पदाधिकारी यांना उत्कृष्टरित्या मार्गदर्शन केले.

# बुद्धिबळ स्पर्धेतील दहावा डावही बरोबरीत



**। सिंगापूर । वृत्तसंस्था ।**

चिनी विश्वविजेता डिंग व भारतीय आव्हानवीर गुकेश यांच्यातील विश्वअजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेतील दहावा डावही बरोबरीत सुटला आहे. दोन्ही खेळाडूंचे प्रत्येकी ५ गुण झालेले आहेत. नवव्या डावाप्रमाणेच दहावा डावसुद्धा अगदीच नीरस झाला.

सिंगापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत डिंगने पांढरी मोहरी घेऊन खेळताना लंडन पद्धतीने डाव चालू केला. सहाव्या डावातही हीच पद्धत त्याने वापरली होती. या डावात त्याने उंटाची एक खेळी बदलली. गुकेशने घाई न करता विचारपूर्वक उत्तर देऊन घोड्याने डिंगच्या उंटावर हल्ला केला. डिंगला डाव गुंतागुंतीचा करण्याच्या अनेक शक्यता होत्या; परंतु या लढतीत पटावरील स्थिती बरोबरीत ठेवण्याचा त्याचा कल पुन्हा एकदा दिसून आला. डिंगने वजिरावजिरी करून पटावर खूपच नीरस स्थिती आणली. त्याने गुकेशची राजासमोरची प्यादी वेडीवाकडी केली; परंतु एवढ्या छोट्या फायद्यावर त्याला डाव जिंकणे अवघड होते. गुकेशने पद्धतशीर रीतीने हळूहळू सर्व मोहऱ्यांची अदलाबदल करायला सुरुवात केली. दोघांनीही आपापले राजे पटाच्या मध्यभागी आणले. आता डिंगला गुकेशच्या वेड्यावाकड्या प्याद्यांचा फायदा घेणे अशक्य झाले. दोघांनीही आपापले उंट पुढे-मागे हलवत पटावर तीच स्थिती तीनदा आणली आणि बरोबरी मान्य केली.

आता क्लासिकल बुद्धिबळातील फक्त ४ डाव बाकी आहेत. या डावांत जर निकाल लागला नाही तर टाय ब्रेक म्हणून जलदगती सामने खेळविले जातील.

## अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२४

# चेंबूर केंद्राची स्वस्तिक मंडळावर मात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

चेंबूर क्रीडा केंद्राने मुंबई उपनगर कबड्डी असो. आयोजित जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पूर्व विभाग प्रथम श्रेणी गटात चेंबूर क्रिडा केंद्राने चौथी, तर उत्कर्ष मंडळाने तिसरी फेरी गाठली आहे. मुंबई उपनगरने संयोजन संस्था चारकोप यांच्या सहकार्याने संचालिका नम्रता भोसले यांच्या सौजन्याने कांदिवलीतील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर या स्पर्धेचे आयोजन केले आहे.



या स्पर्धेत चेंबूर क्रीडा केंद्राने प्रथम श्रेणी गटाच्या तिसऱ्या फेरीत स्वस्तिक मंडळ 'ब'चा प्रतिकार २७-२१ असा मोडून काढला आहे. पूर्वार्धात अत्यंत चुरशीने खेळाला गेलेल्या या सामन्यात दोन्ही संघ १२-१२ अशा बरोबरीत होते. उत्तरार्धात चेंबूर संघाच्या कुणाल पवार, खान रिझवान यांनी आपला खेळ गतिमान करीत सामना आपल्या बाजूने झुकविला. याच गटात उत्कर्षने दुसऱ्या फेरीच्या सामन्यात नवरत्न मंडळावर ३१-१६ असा पाडाव करीत तिसरी फेरी गाठली आहे. मनीष सावंत, सोहम भोसले यांच्या झंझावाती खेळाने पूर्वार्धात २२-0७ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात सावध खेळ करीत सामना खिशात टाकण्यात त्यांना यश मिळाले.

सिद्धार्थ क्रीडा मंडळाने अंश देवांश मंडळाचा ४२-२३ असा सहज पराभव करीत तिसरी फेरी गाठली आहे. मध्यांताराला १९-१0 अशी आघाडी घेणाऱ्या सिद्धार्थ मंडळाने नंतर देखील तोच जोश कायम ठेवत आपला विजय साकारला आहे. गोवंडी स्पोर्टस्‌ने याच गटात पहिल्या फेरीच्या सामन्यात पंढरीनाथ मंडळाला २४-२३ असे चकवित दुसरी फेरी गाठली आहे. पहिल्या डावात 0८-१४ अशा ६ गुणांनी पिछाडीवर पडलेल्या गोवंडी स्पोर्टस्‌ने दुसऱ्या डावात आपला खेळ उंचावत सामना खिशात टाकला आहे. तसेच, दुर्गा परमेश्वरीने छत्रपती मंडळावर ३८-१५ अशी सहज मात करीत दुसरी फेरी गाठली आहे. प्रतीक प्रजापती, अनुज राजभवन यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय दिले जात आहे.

पश्चिम विभागाच्या कुमार गटात जाखमाता मंडळाने नव महाराष्ट्र संघाचा ३७-0९ असा पाडाव केला आहे. अजय भायडे, दर्शन नाक्ति यांच्या उत्कृष्ट खेळाला या विजयाचे श्रेय दिले जात आहे. तर, नव महाराष्ट्र संघाचा मंदार लांजेकर एकाकी लढला.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)